# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२२

---------------------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ / अग्रहायण २८, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण क्रीडा व युवक कल्याण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | कामगार मंत्री | |
| (४) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (५) | पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री | |

------------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ५४**

------------------------------------------

### राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(१) * १५८३९ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.महादेव जानकर, श्री.कपिल पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, ॲड.अनिल परब, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या समान किमान कार्यक्रमानुसार रुपये १८ हजार रुपये मानधन, रिक्त पदी नेमणूक, शासकीय सेवेचा दर्जा, सेवासमाप्तीच्या रकमेत तीन पट वाढ, सन २०१४ पासूनचे निवृत्तीवेतन, पूर्व प्राथमिक शिक्षकांची वेतनश्रेणी, आजारपणात भरपगारी रजा, आरोग्य कवच, डी. टी. एड. धर्तीवर सेवांतर्गत प्रशिक्षण, वारसांचा अनुकंपा तत्वानुसार शासकीय सेवेत समावेश, आठ तास पूर्ण वेळ काम देऊन वेतन इ. मागण्यांकरीता आझाद मैदान, मुंबई येथे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात आंदोलन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांना NEP २०२० नुसार पूर्व प्राथमिक शिक्षकांचा दर्जा देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांकरीता दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास ठाणे शासकीय विश्रामगृहाबाहेर आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर मागण्या पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) हे खरे आहे.
अंगणवाडी कर्मचारी यांनी केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने अंगणवाडी कर्मचारी संघटनासमवेत वेळोवेळी बैठक आयोजित करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन खाटांची संख्या वाढविण्याबाबत

**(२) * १५५९३ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणघाट (जि.वर्धा) येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या दर्जात वाढ करून ४०० खाटांचे श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव आरोग्य विभागाकडे दिनांक १३ जून, २०२२ रोजी वा त्या सुमारास जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, वर्धा यांनी सादर केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने हिंगणघाट शहराची भौगोलिक परिस्थिती पाहता सदर रूग्णालयाचे श्रेणीवर्धन करणे गरजेचे असून सदर प्रस्तावास तातडीने मंजूरी देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.
हिंगणघाट, जि.वर्धा येथील उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा वाढ करुन ४०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव सहसंचालक आरोग्य सेवा यांनी दिनांक ०५/१२/२०२२ रोजी शासनास सादर केला आहे.
(२) हिंगणघाट, जि.वर्धा येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या दर्जात वाढ करुन ४०० खाटांचा श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव निकषात बसत नसल्याबाबत उक्त नमूद दिनांक ०५/१२/२०२२ च्या पत्रातील प्रस्तावामध्ये वस्तुस्थिती शासनास प्राप्त झाली असून त्यानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागामध्ये शासकीय कर्करोग रुग्णालय उभारण्याबाबत

**(३) * १५६६७ डॉ.रणजित पाटील, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या अधिक असून अमरावती विभागात एकही शासकीय रुग्णालय नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील रुग्णांना उपचारासाठी नागपूर, मुंबईमध्ये जावे लागत असून, सदर जिल्ह्यातील रूग्णांकरीता अकोला,अमरावती येथे कर्करोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी शासकीय रुग्णालय उभारण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कर्करोगाचे प्रमाण वाढत असून, कर्करोगाने मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या लक्षणीय असताना देखील कर्करोगाने होत असलेल्या मृत्यूंची सांख्यिकीय माहिती उपलब्ध होत नसल्याची बाब दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कर्करोगाने ग्रस्त रुग्णांना विहित वेळेत आणि योग्य उपचार उपलब्ध करून मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी कर्करुग्णांची माहिती शासनास कळविणे बंधनकारक करण्याबाबत तसेच अमरावती येथे शासकीय रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्ह्यात संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती कार्यरत आहे. तेथे कर्करोग निदान आणि उपचार आरोग्य सेवा दिल्या जातात. कर्करोग उपचारांतर्गत किमोथेरपी आणि शस्त्रक्रिया केल्या जातात. तसेच अकोला आरोग्य सेवा मंडळात महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत एकूण २० रुग्णालयांमार्फत कर्करोग रुग्णांना सेवा पुरविल्या जातात.

(३) हे खरे नाही.

राज्यात ICMR अंतर्गत ७ ठिकाणी Cancer Registry कार्यान्वित आहे. तसेच जिल्हानिहाय कर्करोगाने मृत्यूमुखी पडलेल्या रुग्णांची संख्या हेल्थ मॅनेजमेंट इंन्फॉरमेशन सिस्टिम (HMIS) या पोर्टलवर प्रत्येक महिन्याला त्या-त्या आरोग्य संस्थेमार्फत भरण्यात येते.

(४) सामान्यत : आढळून येणारे कर्करोग उदा. तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशिय मुख कर्करोग या आजारांचे निदान हे सुरुवातीच्या टप्प्यामध्ये झाल्यास त्यावर उपचार घेवून मृत्यू टाळणे शक्य होते. यास्तव राज्यात कर्करोग Notifiable करण्याकरीता आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

तसेच अमरावती संदर्भ सेवा रुग्णालयामध्ये टर्शरी कॅन्सर केअर सेंटर स्थापन करणेबाबत दिनांक ९ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपाडा (ता.वसई, जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील क्रॉस पॉवर प्रा. लि. कंपनीमध्ये झालेल्या गॅस सिलिंडर स्फोटाबाबत

**(४) * १५२२४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपाडा (ता.वसई, जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील क्रॉस पॉवर प्रा. लि. कंपनीत झालेल्या हायड्रोजन गॅस सिलिंडर स्फोटात ३ कामगारांचा जागीच होरपळून मृत्यू झाल्याची, तसेच ८ कामगार जखमी झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दुर्घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच सदरहू घटनेस जबाबदार असलेल्या कंपनी व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करुन मृत पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना तसेच जखमी कामगारांना तातडीने आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) मे.कॉसपॉवर इंजिनीअरींग लि.,सर्वे नं. १३४/१७ ए, पाझर तलाव रोड, चंद्रपाडा,जुचंद्र, नायगांव (पुर्व), ता.वसई जि.पालघर या कारखान्यात दिनांक २८/०९/२०२२ रोजी गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन ४ कामगारांचा मृत्यू व ९ कामगार जखमी झाले आहेत.

(२) सदर दुर्घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून चौकशीदरम्यान खालील बाबी आढळून आल्या आहेत.

कारखान्यात दिनांक २८/०९/२०२२ रोजी ऑक्सिजन सिलेंडर करीता वापरला जाणारा मॅनिफोल्ड व रेग्युलेटर डिझॉल्व्हड ॲसिटीलीन गॅस सिलेंडर करीता वापरण्यात आला होता.रेग्युलेटरला बसविण्यात आलेल्या प्रेशर गेजची बर्डन ट्यूब तांब्याच्या धातूपासून बनविण्यात आली होती. ॲसिटीलीन गॅस तांब्याच्या ट्यूबच्या संपर्कात आल्याने त्याचे विघटन होऊन ॲसिटीलीन सिलेंडरमधील दाब वाढल्याने स्फोट झाला असल्याचे निदर्शनास आले.

सदर कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द कारखाने अधिनियम,१९४८ च्या कलम ७-A(२)(a) व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ नियम ४(४) च्या तरतुदींनुसार मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला असून, पोलीस विभागामार्फतही कारखान्याच्या दोन्ही संचालकांविरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

व्यवस्थापनाने कामगार नुकसान भरपाई विमा पॉलीसी घेतली आहे. तसेच मृत कामगारांच्या वारसांस नुकसान भरपाई मिळण्याकरीता आयुक्त, नुकसान भरपाई, ठाणे यांना कळविण्यात आले असून,त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

तसेच कारखान्याच्या भोगवटादाराने ४ मृत कामगारांच्या वारसांस प्रत्येकी रुपये ५ लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्याचे लेखी कळविले असून, त्यापैकी रुपये ९.२५ लक्ष इतकी रक्कम वितरित केली आहे. तसेच जखमी कामगारांच्या वैद्यकीय उपचाराचा आतापर्यंत रुपये ४१ लक्ष इतका खर्च व्यवस्थापनाने केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रुग्णाच्या उपचारात झालेल्या दिरंगाईबाबत

**(५) * १५११७ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व्हेंटीलेटर अभावी कु. वैष्णवी राजू बागेश्वर या १५ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२२ च्या अंतिम सप्ताहात वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मुलीच्या उपचाराकरीता व्हेंटीलेटर उपलब्ध करून देण्याऐवजी तब्बल २४ तासांहून अधिक काळ ''आर्टीफीशिअल मॅन्युअल ब्रिदिंग युनिट'' (अंबू बॅग) या तात्पुरत्या व्यवस्थेवर ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि सदर उपचारात अक्षम्य दिरंगाई करणाऱ्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) रुग्णालयातील अतिदक्षता विभागातील सर्व व्हेंटीलेटर गंभीर आजार असलेल्या रुग्णाकरीता वापरात असल्याने सदरहू मुलीस "आर्टीफीशिअल मॅन्युअल ब्रिदिंग युनिट" (अंबू बॅग) या तात्पुरत्या व्यवस्थेवर ठेवण्यात आले होते हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना त्यांच्या अधिष्ठाता या पदावरुन दिनांक ३०/०९/२०२२ पासून कार्यमुक्त करण्यात आले असून त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लाडीवली (ता.पनवेल, जि.रायगड) तसेच इतर नजिकच्या गावांमध्ये दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(६) * १५५६१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाडीवली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे तसेच इतर नजिकच्या गावात होणाऱ्या दूषित पाणीपुरवठ्याबाबत लाडीवलीतील महिला व आदिवासी बांधवांमध्ये असंतोष निर्माण झाला असून, ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली कोकण भवन येथील कोकण आयुक्त कार्यालयासमोर दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी सदर प्रकरणी कार्यवाही करण्याचे आश्वासन देऊनही सदर गावांमध्ये दूषित पाण्यामुळे होणाऱ्या समस्यांचे निराकरण झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असून उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या गटविकास अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाडीवली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे तसेच इतर नजिकच्या गावात शुध्द पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय.
(२) नाही.
(३) अशी बाब नाही.

चावणे ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून गुळसुंदे ह्या ग्रामपंचायत हद्दीतील लाडीवली गाव व लाडीवली आदिवासीवाडी येथे पाणीपुरवठा करण्यात येतो. सदर योजनेतील स्त्रोत तसेच वितरण बिंदू येथून पाण्याचे नमुने भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, उप विभागीय कार्यालय, प्रयोगशाळा, ता.पेण येथे वेळोवेळी अणुजैविक तपासणीसाठी पाठविण्यात येतात. दिनांक १२/०३/२०२१, दिनांक १६/०७/२०२१, दिनांक २७/०९/२०२१, दिनांक ०७/१२/२०२१, दिनांक ०२/०२/२०२२, दिनांक २२/०८/२०२२, दिनांक २६/०९/२०२२ व दिनांक ०६/१०/२०२२ रोजीच्या पाणी तपासणी अहवालानुसार, सदर पाणी पिण्यास योग्य असल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) सदर योजना जुनी असल्याने ग्रामपंचायत मागणीनुसार MIDC च्या पाईपलाईनवरून टॅपींग घेवून, जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रक्कम रुपये १२४.०० लक्ष अंदाजपत्रकीय रकमेची योजना नव्याने प्रस्तावित करून निविदा प्रक्रियेद्वारे दिनांक ३०/०३/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. तसेच याप्रकरणी MIDC कडून ग्रामपंचायत गुळसुंदेस दिनांक ०३/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये टॅपींगची मंजूरी मिळाली असून, याबाबतचे काम प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्याबाबत

**(७) * १५७२५ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडा वॉटर ग्रीड या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सन २०१९ मध्ये शासनाने प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली असून प्रकल्पाचा प्रथम टप्पा सुरू करण्यासाठी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून सदर योजनेमुळे वर्षानुवर्षे पडत असलेला दुष्काळ निवारण्यासाठी मराठवाड्याला हक्काचे पाणी मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्ध्व वैतरणा धरणातून गोदावरी खोऱ्यात पाणी सोडता यावे तसेच उर्वरित पाणी वळविण्याबाबतच्या योजनांचे सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळूनही त्याची अंमलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मराठवाडा वॉटर ग्रीड महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) वैतरणा-मुकणे प्रवाही वळण योजना या कामास जलसंपदा विभागामार्फत दिनांक २४/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. अनुषंगीक कामे सुरु करण्यात आलेली असून, प्रत्यक्ष कामांना शेतकऱ्यांचा विरोध असल्याने कामे सुरु झालेली नाहीत.

पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी, तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी ३० प्रवाही वळण योजनांची कामे विविध टप्प्यावर प्रगतीपथावर असून, यापैकी १४ प्रवाही वळण योजनांची कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहेत. तसेच ०५ प्रवाही वळण योजना बांधकामाधीन व ११ प्रवाही वळण योजना प्रस्तावित आहेत. त्यापैकी ०४ वळण योजनांचा प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्रगतीत आहे.
(३) मा.मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मराठवाडा वॉटर ग्रीडची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण व पुढील टप्प्यात औरंगाबाद जिल्ह्यातील इतर भाग, बीड, उस्मानाबाद, लातूर आणि उर्वरित पुढील टप्प्याबाबत निधी व पाण्याच्या उपलब्धतेनुसार निर्णय घेण्यात येणार आहे. सद्य:स्थितीत, जल जीवन मिशन अंतर्गत परतूर, मंठा, पैठण, गंगापूर-वैजापूर, सिल्लोड, जळकोट-उदगीर, हदगाव-हिमायतनगर, भोकर-अर्धापूर-मुदखेड, व पालम या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदरील योजनांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाबाबत केंद्र शासनाकडे अनुपालन अहवाल पाठविण्याची कार्यवाही व त्याबाबतचा पाठपुरावा विभागामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) येथील ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(८) * १५७५४ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) येथील सन २०१७ पासून प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेली रस्त्याची कामे निकृष्ट दर्जाची असून, उक्त कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे.
(२) प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सन २०१७ नंतर कर्जत व जामखेड मतदार संघात कामे मंजूर नाहीत. तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत सन २०१७ पासून कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) मधील एकूण ६२ कामे मंजूर आहेत. त्यापैकी ५३ कामे पूर्ण झालेली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

सद्य:स्थितीत सदर कामांच्या विविध टप्प्यांवर वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरीक्षक व राज्य गुणवत्ता निरीक्षक यांच्याकडून एकूण २३४ तपासण्या झाल्या असून ४ कामांचे शेरे असमाधानकारक (U) व ८ कामांचे शेरे समाधानकारक परंतु सुधारणा करणे आवश्यक (SRI) असे शेरे प्राप्त आहेत. सदर असमाधानकारक (U) व समाधानकारक परंतु सुधारणा करणे आवश्यक असे शेरे प्राप्त झालेल्या कामांची संबंधित ठेकेदाराकडून सुधारणा करून घेऊन सदर कामांना समाधानकारक शेरा प्राप्त झालेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील सी पी आर या रुग्णालयातील नर्सिंग अभ्यासक्रमाच्या जागा वाढविण्याबाबत

**(९) * १५७०४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्याची आरोग्यदायी असलेल्या सी पी आर या हॉस्पिटलमध्ये सन १९५४ मध्ये नर्सिंग स्कूल व कॉलेजची स्थापना झाली तेव्हापासून आजपर्यंत ६५ वर्षानंतर नर्सिंग अभ्यासक्रमासाठी २० जागांची क्षमता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयाने नर्सिंगच्या १०० जागांसाठीचा प्रस्ताव शासनाकडे दिला आहे, सदर प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सी पी आर रुग्णालयातील (ता.जि.कोल्हापूर) नर्सिंगच्या जागा वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या ठिकाणी नवीन नर्सिंग अभ्यासक्रम सुरु करणे तसेच, अस्तित्वात असलेल्या नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यासाठी परिपूर्ण प्रस्ताव संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांच्याकडून मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे, गडचिरोलीसह राज्यातील जिल्हा परिषद शाळांच्या धोकादायक इमारतींची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०) * १५४६६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गट्टा केंद्राअंतर्गत वाळवी (जि.गडचिरोली) या दुर्गम व आदिवासी गावात जिल्हा परिषदेची वर्ग १ ते ४ पर्यंत एक शिक्षकी शाळा असून, सदर शाळेची इमारत धोकादायक व जीर्ण झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ.वाळवी गावातील समाजभवन असलेल्या गोटुल भवनात बांबुपासून इमारत भिंती तयार करुन विना खर्चाची पण टिकाऊ शैक्षणिक साधने तयार करुन राबविण्यात येत असलेली शैक्षणिक प्रक्रिया लक्षात घेता जीर्ण व धोकादायक झालेल्या इमारतींची पुर्नबांधणी करण्यात यावी अशी मागणी तेथील ग्रामस्थ व शिक्षकांकडून शासनाकडे करण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ४५७ शाळांपैकी १२५ शाळांचे २०४ वर्ग धोकादायक असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून वर्गखोल्यांच्या दुरुस्तीकरीता रुपये ५ कोटी ७३ लाखाचा प्रस्ताव शासनाकडे गत पाच वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील सुमारे २०० शाळांची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून दुरुस्तीअभावी सुमारे सदर शाळेतील १० हजार विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला असून या शाळांमध्ये दुर्घटना झाल्यास याची सर्व जबाबदारी प्रशासनावर असतानाही या वर्ग खोल्यांची दुरुस्ती केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली या आदिवासी नक्षलग्रस्त तालुक्यातील व गट्टा केंद्राअंतर्गत वाळवी गावातील तसेव ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरुस्तीसाठी त्वरित निधी वितरीत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## रायगड जिल्ह्यातून मुंबईस सागरी बोट रुग्णवाहिका सुरु करण्याबाबत

**(११) * १६११९ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग जिल्हा रुग्णालयातील तसेच मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातग्रस्त रुग्णांना तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी याकरीता रुग्णांना सागरी वाहतुकीद्वारे मुंबईला हलविण्याचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रायगड बोट रुग्णवाहिकेचा प्रस्ताव गत ५ वर्षापासून शासनाकडे प्रलंबित असल्याचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिबागहून मुंबईला रस्त्याने पोहोचण्यास चार ते पाच तास लागतात तथापि, सागरी मार्गाने (बोट रुग्णवाहिकाद्वारे) मुंबई येथे पोहोचण्यास पावणे दोन तास लागतात हे लक्षात घेता जिल्हा प्रशासनाने शासनाकडे सादर केलेला सागरी बोट रुग्णवाहिका प्रस्ताव अद्याप प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सागरी बोट रुग्णवाहिका चालू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

तथापि, सदरचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला असता, सन २०१७-१८,२०१८-१९ आणि २०१९-२० मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान प्रारुप आराखड्यात नामंजूर करण्यात आला तथापि, पुरवणी प्रारुप आराखड्यात सदर प्रस्तावास सन २०१९-२०मध्ये प्रायोगिक तत्वावर मंजूरी देण्यात आली व त्या अनुषंगाने दिनांक ७ ऑगस्ट २०२० मध्ये प्रस्तावाची व्यवहार्यता तपासणीच्या अधिन राहून त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

(३) दिनांक ७ ऑगस्ट २०२० रोजी प्रस्तावाची व्यवहार्यता तपासणीच्या अधिन राहून त्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली तथापि, सदर मान्यतेनुसार प्रस्तावाचा पुन:श्च अभ्यास केला असता रायगड येथे जिल्हा रुग्णालय असल्याने प्रत्येक रुग्णास मुंबईत नेण्याची आवश्यकता नाही. तसेच मुंबईला १०८ रुग्णवाहिकेने न्यावयाचे असल्यास पावणेतीन ते तीन तास लागतात. त्याप्रमाणे बोटीने नेताना बोटीपर्यंत आणणे, बोटीचा प्रवास व बोटीतून परत मुंबईत रुग्णालयात नेण्यासाठी अडीच ते तीन तास लागण्याची शक्यता आहे. परंतु रुग्णास किमान दोन वेळा वाहनातून बोट व बोटीतून वाहन असा चढ उतार करणे क्रमप्राप्त आहे. मात्र १०८ रुग्णवाहिकेने सरळ रुग्णालयात आणणे शक्य आहे व ते रुग्णाच्या आरोग्याच्या दृष्टिने अत्यावश्यक आहे. या सर्व मुद्यांचा विचार करता बोट रुग्णवाहिकेची मागणी करण्यात आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) * १५९२७ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.एकनाथराव खडसे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.जयंत पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील 'गट क' च्या १८ संवर्गातील १३ हजार ५२१ पदे ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी महाआयटी मार्फत सन २०१९ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन लाखो उमेदवारांनी महापरीक्षा संकेतस्थळावर अर्ज दाखल केले परंतु दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केलेल्या शासन निर्णयाद्वारे भरतीच्या कालबध्द वेळापत्रकास ग्रामविकास विभागाने स्थगिती देऊन पुन्हा नव्याने संपूर्ण भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदभरतीसाठी वित्त विभागाची परवानगी असतानाही ग्रामविकास विभागामार्फत होणारी पदभरती प्रलंबित असून, सदर नव्याने पदभरतीमध्ये सहभागी होणाऱ्या उमेदवारांना पुनश्च अर्ज करावे लागणार असून, नव्याने भरती प्रक्रियेसाठी वयाधिक्य झालेल्या उमेदवारांना सामावून घेणेबाबत शासनाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, पुणे, नागपूर, औरंगाबाद व मुंबई विभागासह राज्यातील जिल्हा परिषदेंतर्गत भरती प्रक्रिया अद्याप न झाल्याने विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले असून वर्धा जिल्हा परिषदेंतर्गत वर्ग क व वर्ग ड च्या एकूण ५,२०४ पदांपैकी सामान्य प्रशासन, वित्त, पंचायत, आरोग्य, कृषी, पाटबंधारे विभागात ९७६ पदे रिक्त असल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जळगांव जिल्हा परिषद वर्ग १, वर्ग २ व व वर्ग ३ तसेच शिक्षक, ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त असलेल्या पदांची संख्या किती व सदर पदे केव्हापासून रिक्त आहेत याचा राज्यातील विकासकामांवर व इतर दैनंदिन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जिल्हा परिषदेंतर्गत येणारी सर्व रिक्त पदे जिल्हा परिषद स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड मंडळामार्फत भरण्याबाबतचा निर्णय ग्रामविकास विभागाने दिनांक १० मे, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतला असून त्यानुसार परीक्षा घेण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना दिलेल्या सूचनेन्वये करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती व स्वरुप काय आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ग्रामविकास विभागांतर्गत जिल्हा परिषदेतील रिक्त पदांच्या रद्द केलेल्या भरतीप्रकिया पुन:श्च सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. माहे मार्च, २०१९ च्या जाहिरातीप्रमाणे ज्या उमेदवारांनी यापूर्वी अर्ज केलेले/भरलेले आहेत, व सध्या वयाधिक्य झाले असल्याने ते परीक्षेस बसण्यास अपात्र होऊन अशा उमेदवारांचे नुकसान होऊ नये, याकरीता अशा उमेदवारांचे अर्ज स्वीकारून पुढील फक्त एका परीक्षेस बसण्याकरीता अशा उमेदवारांना वयोमर्यादेत सूट देण्यात आलेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे. सद्य:स्थितीत

वर्ग १ - १२८,

वर्ग २- ६८,

वर्ग ३- २४४६ (शिक्षक, ग्रामसेवक व इतर कर्मचाऱ्यांसह) अशी एकूण २६४२ पदे रिक्त आहेत.

(५) विभागीय मागासवर्गीय कक्षाकडून बिंदुनामावली तपासून घेवून बिंदुनामावली अंतिम करण्याची कार्यवाही चालू आहे.

(६) ग्रामविकास विभागाच्या दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये पदभरतीचा कालबध्द कार्यक्रम (परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक) जाहीर करण्यात आले आहे.

-----------------

## राज्यातील आदिवासी भागातील बालकांमधील कुपोषणाचे व बालमृत्यूचे वाढते प्रमाण रोखण्याबाबत

**(१३) * १६२४९ श्री.अंबादास दानवे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नंदुरबार, अमरावती, पालघर, गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यात सुमारे १२००० पेक्षा अधिक आदिवासी बालके कुपोषित असून सदर भागातील रस्त्यांच्या दुर्दशेमुळे आदिवासी बालकांच्या तपासणीकरीता वैद्यकीय तज्ञांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाट (जि.अमरावती) येथे कमी वजन, प्री-मॅच्युअर, जंत संसर्ग, न्युमोनिया, जन्मताच व्यंग अशा विविध आजारांमुळे २७ बालकांचा व ९ नवजात बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, औषधांचा अपुरा पुरवठा, रक्ताचा तुटवडा, प्रत्यक्षात माता, बालकांना पोषण आहार व्यवस्थित न मिळणे, वेळीच उपचार न मिळणे तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे यामुळे बालमृत्यूसह कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वैद्यकीय शिक्षण संचालनालय वर्ग “अ “ अंतर्गत येणाऱ्या विशेषज्ञांच्या १७८६ जागांपैकी तब्बल ११११२ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले असून, सदर रिक्त पदांमुळे मेळघाट तसेच नंदुरबार परिसरातील आदिवासीं बालकांच्या कुपोषणाचे प्रमाणात वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास,आदिवासी बालकांच्या कुपोषणाच्या समस्येवर मात करण्याच्या दृष्टीने वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरुन बालमृत्यू रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

सदर ५ जिल्ह्यामध्ये नियमित ५२ बालरोग तज्ञ, ३९ स्त्रीरोग तज्ञ, २५ कंत्राटी बालरोग तज्ञ व २५ कंत्राटी स्त्रीरोग तज्ञ कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

मेळघाट (जि.अमरावती) येथे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांचा मृत्यू कुपोषणाने झालेले नसून जन्मत: वजन कमी, प्री-मॅच्युअर, जंत संसर्ग, न्युमोनिआ व जन्मत:च व्यंग या विविध वैद्यकीय कारणांमुळे झालेले आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) हे खरे नाही.

आरोग्य विभागांतर्गत १७८६ विशेषज्ञांच्या पदांपैकी ७९० पदे भरलेली असून उर्वरित ९८८ पदे सरळसेवेने तसेच पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया चालू आहे. तसेच मेळघाट कार्यक्षेत्रात राज्यातील इतर भागातील बालरोग तज्ञ व स्त्रीरोग तज्ञ यांना चक्राकार पध्दतीने प्रतिनियुक्ती देण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जलजीवन मिशन अंतर्गत नळ जोडण्यांचे उद्दीष्ट पूर्ण करण्याबाबत

**(१४) * १५९५१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १३८६३ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा असलेल्या जल जीवन मिशनअंतर्गत सन २०२४ पर्यंत प्रत्येक घरात नळाने पाणीपुरवठा करण्यासाठी जारी केलेल्या निधीपैकी केवळ २५ टक्केच निधी प्रत्यक्षात खर्च झाल्याचे सन २०२१-२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेच्या निधी खर्चाबाबत सक्षमपणे अंमलबजावणी करण्याच्या हेतूने शासनाने जिल्हानिहाय माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली,

(३) असल्यास, नगर जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनेच्या निविदेतील कागदपत्रांद्वारे होत असलेल्या गैरकारभाराबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पाणीपुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलजीवन मिशन कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयाशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वरील योजनेच्या निधी खर्चाबाबत, नळजोडण्या देण्याचे उद्दीष्ट पुर्ततेसाठी व सक्षम अंमलबजावणीसाठी कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

जल जीवन मिशनचा कालावधी सन २०१९ ते मार्च २०२४ असा आहे. सन २०२१-२०२२ वर्ष अखेर राज्य पाणी व स्वच्छता मिशनमार्फत क्षेत्रिय यंत्रणांना रुपये ७३१२६४.५८ लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आला असून यापैकी रुपये २८५५६६.२३ लक्ष एवढा निधी (३९.०५%) खर्च झाला आहे.

(२) जल जीवन मिशन अंतर्गत वितरित करण्यात आलेला निधी खर्च करण्याबाबत प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी जिल्हा यंत्रणांच्या घेतलेल्या साप्ताहिक आढावा बैठकीत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच याबाबत राज्य पाणी व स्वच्छता मिशनस्तरावरुन पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) नमूद निवेदन या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(४) जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत राज्यात ३७०४७ योजना करण्याचे प्रस्तावित आहे. योजनांचे सर्वेक्षण, प्रकल्प अहवाल तयार करणे व संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक महसुली विभागासाठी प्रकल्प सल्लागार संस्थेची निवड करण्यात आली आहे. दिनांक २८/११/२०२२ रोजीच्या स्थितीस अनुसरुन जिल्हा परिषदेच्या ३६१७६ योजनांपैकी २७६९७ योजनांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८७१ योजनांपैकी ४६० योजनांचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) क्षेत्रिय कार्यालयाशी सुयोग्य समन्वयातुन विहीत मुदतीत कामे पूर्ण करण्यासाठी प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग साप्ताहिक आढावा बैठका घेत आहेत. बैठकीत जिल्हा यंत्रणांना येणाऱ्या अडचणी निवारणाकरीता तात्काळ यथोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये बालकांना निकृष्ट दर्जाच्या पोषण आहाराच्या वाटपाबाबत

**(१५) * १५४४४ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील सुमारे ६० टक्के अंगणवाड्यांमध्ये निकृष्ट पोषण आहार देण्यात आला असून त्यात सडलेले खराब झालेले वाटाणे, गहू, हरभरा आणि तांदूळ इत्यादी निकृष्ट आहारांचे बालकांना वाटप करण्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी सदर समस्या प्रशासनाकडे सादर केली असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर जिल्ह्यातील अंगणवाडीतील बालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ नये याकरीता दर्जेदार आहार पुरवठा करुन सदर प्रकरणी दोषी आढळणाऱ्या पुरवठादारांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर प्रकल्पातील १८ व सावनेर प्रकल्पातील ३३ असे एकूण ५१ अंगणवाडी केंद्रामध्ये चना व वाटाणा यांचा खराब पुरवठा झाल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने खबरदारीचा उपाय म्हणून सदर पुरवठा बदलून घेण्यात आला. तसेच त्या कालावधीत प्राप्त झालेले कच्चे धान्य व किराणा मालाचे नमुने प्रादेशिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नागपूर या शासकीय प्रयोगशाळेला तपासणी करीता पाठविण्यात आले असता, सदर नमुने योग्य असल्याबाबत प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल प्राप्त झालेला आहे.

(२) व (३) प्रकल्पाने तक्रार प्राप्त होताच पुरवठा झालेल्या मालाची शासकीय प्रयोगशाळेत तपासणी करुन घेतली आहे. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून नागपूर जिल्ह्यासाठी कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन या संस्थेस नियमित उत्कृष्ट दर्जाचा पुरक पोषण आहाराचा पुरवठा करण्याबाबत जिल्हा कार्यक्रम अधिकारी, नागपूर यांनी कळविले आहे व उत्कृष्ट मालाचा पुरवठा होईल याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साबळेवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील श्री.अंबिका देवस्थानाला ‘क’ वर्गाचा दर्जा मिळणेबाबत

**(१६) * १५२२६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साबळेवाडी, (ता.खेड, जि.पुणे) येथे श्री.अंबिका देवस्थान मंदिर पुरातत्व काळापासून अस्तित्वात असून लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी वर्गणीद्वारे निधी जमा करुन देवस्थानचा जीर्णोद्धार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, नवरात्रोत्सव, मार्गशीर्ष पोर्णिमा व चैत्र पोर्णिमा या उत्सवांना श्री.अंबिका देवस्थान मंदिरात सुविधाअभावी असल्याने गर्दी होत असून, सदर गर्दी टाळण्यासाठी विकास कामे होणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भाविकांकडून मिळत असलेल्या देणग्यांतुन मंदिरात विकास कामे करण्यावर मर्यादा येत असून, देवस्थान ट्रस्टवर ताण पडत असल्याने श्री.अंबिका देवस्थान ट्रस्ट, साबळेवाडी (ता.खेड, जि.पुणे) यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.पालकमंत्री यांच्याकडे दिनांक २७ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास एका निवेदनाद्वारे शासनाकडून देवस्थानला ‘क’ वर्गाचा दर्जा देण्यात यावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने श्री.अंबिका देवस्थान ट्रस्टच्या मागणीनुसार देवस्थानास ‘क’ वर्गाचा दर्जा देण्यासंदर्भात काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) संबंधित ट्रस्टमार्फत जिल्हा परिषद यांना प्राप्त झालेला प्रस्ताव अपूर्ण असून कागदपत्रांची पूर्तता करण्यात येत आहे. कागदपत्रांची पूर्तता झाल्यास पुढील कार्यवाही शक्य आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा रुग्णालयातील सीटीस्कॅन मशिन नादुरुस्त असल्याबाबत

**(१७) * १५२९४ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्हा रुग्णालय (जिल्हा सर्वोपचार रुग्णालय) (जि.अकोला) येथील सीटीस्कॅन मशीन नादुरुस्त असल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरुन सीटीस्कॅन करुन अहवाल आणावे लागत असल्यामुळे गरीब रुग्णांच्या तपासणीत समस्या निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने रुग्णांना सदर रुग्णालयातच सीटीस्कॅन सेवा उपलब्ध व्हावी यादृष्टीने सीटीस्कॅन मशीनची त्वरित दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
संस्थेतील सीटीस्कॅन मशिन नादुरुस्त असल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून रुग्णालय परिसरातील अतिविशेषोपचार रुग्णालय, अकोला येथे रुग्णांना सीटीस्कॅन करुन दिले जात आहे. त्यामुळे गरीब रुग्णांच्या तपासणीकरीता समस्या निर्माण होत नाहीत.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तोरणमाळ (ता.आक्राणी,जि.नंदुरबार) विकास प्राधिकरणाची स्थापना करण्याबाबत

**(१८) * १६१९९ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तोरणमाळ (ता.आक्राणी,जि.नंदुरबार) विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यासाठी रुपये ५०३५० लक्ष इतक्या रकमेच्या निधीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी दिनांक ९ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय, तसेच यासंदर्भात सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तोरणमाळ (ता.आक्राणी, जि.नंदुरबार) विकास प्राधिकरणाची स्थापना तात्काळ होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) होय.

(२) व (३) तोरणमाळ गिरीस्थानाच्या पर्यटन विकासाकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई, पुणे, ठाण्यासह राज्यात डेंग्यू,मलेरियाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याबाबत

**(१९) * १५२५२ श्री.महादेव जानकर, श्री.गोपिचंद पडळकर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, पुणे, ठाण्यासह राज्यात साथीच्या आजारात वेगाने वाढ होत असून, या जिल्ह्यांमध्ये डेंग्यू, मलेरियाच्या रुग्णामध्ये आणि बोका व्हायरस या श्वसन विकाराशी संबंधित रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे जुलै, २०२२ मध्ये मुंबईत स्वाईन फ्लूचे १०५, मलेरियाचे ६७१, डेंग्यूचे ६१ रुग्ण तर ठाण्यात डेंग्यूचे १९१ आणि मलेरीयाचे १६७ रुग्ण आढळून आल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईमध्ये माहे सप्टेंबर, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात डेंग्यूचे ५९ रुग्ण आढळले असून मलेरियाचे १९१ रुग्ण तर पुण्यात ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सुमारे २०० पेक्षा अधिक डेंग्यूचे रुग्ण आढळल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डेंग्यू, मलेरिया, बोका व्हायरस व इतर साथीच्या आजारांचा प्रसार रोखण्याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

या जिल्हयांमधील एकूण रुग्णसंख्येत वाढ झालेली आहे. परंतु नोव्हेंबर, २०२२ महिन्यात तुलनेने रुग्णसंख्या घटली आहे. तसेच बोका व्हायरस या विषाणूचे काही तुरळक रुग्ण अधून मधून आढळून येतात त्यामध्ये कोणतीही वाढ झालेली आढळून येत नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मुंबई, ठाणे, पुणे तसेच संपूर्ण राज्यामध्ये माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये मलेरिया, डेंग्यू व स्वाईन फ्लू रुग्णांची माहिती खालीलप्रमाणे-

| | मलेरिया | डेंग्यू | स्वाईन फ्लू |
|---|---|---|---|
| मुंबई | ३७८६ | ९४८ | ४२२ |
| ठाणे | ९०५ | ५८८ | १०७३ |
| पुणे | २६ | १५२२ | २१०३ |
| राज्य (एकूण) | १४२३५ | ७४६९ | ३६९१ |

सन २०२२ मध्ये माहे एप्रिल, मे, जून या महिन्यांमध्ये डेंग्यू व मलेरियासाठी राबविलेल्या विविध

प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे राज्यात डेंग्यू व मलेरिया रुग्णांमध्ये घट झालेली दिसून येते.

(४) डेंग्यू, मलेरिया आणि स्वाईन फ्ल्यू हे आजार अधिसूचित केलेले आहेत. डेंग्यू, मलेरिया हे आजार डासापासून होतात. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात डासाच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना केलेल्या आहेत.

१. सर्वेक्षण-

- आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित ताप सर्वेक्षण.
- साथरोग उद्रेकाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी जिल्हा पातळीवर शीघ्र प्रतिसाद पथके कार्यरत.
- उद्रेकाच्या ठिकाणी जलद ताप रुग्ण सर्वेक्षण. तर जिल्हयांनी हा उद्रेक २४ ते ४८ तासात कळविणे आवश्यक आहे.
- १५ महानगरपालिका येथे या आजाराच्या नियंत्रणासाठी परिषण कालावधीमध्ये (ब्रीडींग चेकर्स) ५ महिन्यांसाठी नेमणूक करणेत आलेली आहे.
- राज्यात डेंग्यू विषाणूजन्य तापाच्या निदानासाठी ४३ सेंटीनल सेंटर्सची स्थापना केली असून राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था, पुणे येथेही निदानाची व्यवस्था आहे.
- डेंग्यू, मलेरिया रुग्णांना लक्षणाधारीत उपचार.
- सर्व आरोग्य संस्थांना औषधे व इतर साधन सामुग्रीचा पुरेसा पुरवठा.

२. किटक नियंत्रणासाठी करीत असलेल्या उपाययोजना-

- उद्रेकाच्या ठिकाणी किटकशास्त्रीय सर्वेक्षण आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत रोज १० टक्के घरामध्ये किटकशास्त्रीय सर्वेक्षण व राज्यातील हिवतापासाठी अतिसंवेदनशील निवडक व उद्रेकग्रस्त गांवामध्ये सिंथेटिक प्रायारेथ्राईड गटातील किटकनाशकाची घरोघरी फवारणी करण्यात येते.
- राज्यामध्ये ३,५९,६२३ मच्छरदाण्याचे (LLIN) वाटप करण्यात आले.
- राज्यामध्ये योग्य डासोत्पत्तीस्थानांमध्ये डास अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात.
- त्याचप्रमाणे गटारी वाहती करणे, पाणी साठू न देणे इ. उपायोजना करण्यात येतात.

३. जनजागृती-

- शालेय डेंग्यू व हिवताप जागृती मोहिम - शाळेतील मुलांना डास अळया ओळखण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.
- दरवर्षी जागतिक डेंग्यू दिन १६ मे व जागतिक हिवताप दिन २५ एप्रिल या दिवशी जिल्ह्यात प्रभात फेरी काढून डेंग्यू व हिवताप जनजागृती करण्यात येते.
- गणेश उत्सव,दुर्गा पुजा उत्सव येथे डेंग्यू व हिवताप आजाराविषयी प्रदर्शन लावून जनमानसात किटकजन्य आजारबाबत जन जागृती कार्यक्रम राबविण्यात येतात.
- राज्यामध्ये एप्रिल, २०२२ हा महिना जागतिक हिवताप महिना व जून, २०२२ हा हिवताप प्रतिरोध महिना म्हणून साजरा करण्यात आला.
- शासकीय तसेच खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांचे डेंग्यू व मलेरिया संदर्भातील रुग्ण व्यवस्थापन विषयक कार्यशाळेचे आयोजन.
- उद्रेकग्रस्त ठिकाणी उपाययोजनांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा/ विभागीय/ राज्यस्तरीय

अधिकाऱ्यांच्या भेटी.

- साथरोगाचे दैनंदिन सर्वेक्षण, किटकजन्य आजारासाठी किटक शास्त्रीय सर्वेक्षण.
- उपचारासाठी आवश्यक औषधांची पुरेशी उपलब्धता तसेच सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये उपचारांच्या सुविधा.
- निदानासाठी प्रयोगशाळा सुविधा.
- स्वाईन प्रतिबंधासाठी अतिजोखमीच्या व्यक्तींना ऐच्छिक व मोफत लसीकरण.
- किटकजन्य आजारासाठी एकात्मिक किटक व्यवस्थापन, पाणी गुणवत्ता नियंत्रण, साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी राज्यस्तरीय तांत्रिक समितीची स्थापना.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरासह राज्यातील रुग्णालयांतील बोगस फिजिओथेरपिस्टवर कारवाई करण्याबाबत

**(२०) * १६००७ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच मुंबई शहरात कोणत्याही प्रकारच्या मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी नसतानाही शहरातील नामांकित रुग्णालयांमध्ये बोगस फिजिओथेरपिस्ट रुग्णांवर उपचार करीत असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय,राज्य व जिल्हा पातळीवरील फिजिओथेरपिस्ट संस्थांकडे नोंदणी करणे अनिवार्य असताना अनेक फिजिओथेरपिस्ट नोंदणी न करतांच रुग्णालयांत कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,आर्थिक बचत व्हावी याकरीता अनेक रुग्णालयांनी मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी घेतलेल्या फिजिओथेरपिस्टना नियुक्ती दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोगस फिजिओथेरपिस्टसबाबत शासनाने शहरातील सर्व रुग्णालयांची तपासणी केली आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील तसेच मुंबई शहरातील रुग्णालयात आढळून आलेल्या बोगस फिजिओथेरपिस्टवर व रुग्णालयावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

अशा प्रकारची घटना मुंबई शहरातील विक्रोळी परिसरात खाजगी रुग्णालयामध्ये घडल्याचे आढळून आले आहे.

(२) अशी बाब शासनास आढळून आलेली नाही.

(३) अशी बाब शासनास आढळून आलेली नाही.

(४) राज्यात बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायिकांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसायोपचार

व भौतिकोपचार परिषद, मुंबई यांच्यामार्फत टि.व्ही., रेडीओ तसेच वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देऊन जनजागृती केली आहे.

(५) याबाबत महाराष्ट्र राज्य, व्यवसायोपचार व भौतिकोपचार परिषद, मुंबई यांच्याकडून बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायिकाविरुध्द पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून त्यांच्यावर पोलिसांमार्फत कारवाई करण्यात येत आहे.

तसेच उक्त परिषदेमार्फत १९ बोगस फिजिओथेरपिस्ट व्यावसायिक व १३ बोगस फिजिओथेरपिस्ट शैक्षणिक संस्था यांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महिला बचतगटांना अनुदान वितरित करण्याबाबत

**(२१) * १५९७७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व बालविकास विभागाअंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील तसेच अंगणवाडीत येणाऱ्या ३ ते ६ वर्षे वयाच्या मुलांसह गर्भवती माता, स्तनदा माता यांना गरम व ताजा आहार पुरविण्याचे काम महिला बचत गटामार्फत करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून त्यासाठी ५०-५० टक्के निधी वितरीत करण्यात येत असून सद्य:स्थितीत शासनाकडे ९० कोटीचा निधी उपलब्ध असूनही गत दहा वर्षापासून महिला बचत गटांना शासनाकडून देयके अदा करण्यात आली नसून या बचत गटांच्या महिलांना महिला व बालविकास आयुक्त कार्यालयात प्रलंबित देयकांच्या मागणीकरीता वारंवार विचारणा करण्यासाठी जावे लागत असल्याची बाब माहे, ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाने बचत गटाच्या खात्यावर थेट निधी वर्ग करण्याची प्रणाली डिसेंबर, २०२१ मध्ये अनुसरण्याचे निदेश राज्य शासनास दिले असतानाही तांत्रिक सबब देऊन बचत गटाच्या खात्यावर थेट रक्कम जमा केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील बचत गटांची प्रलंबित देयके तातडीने अदा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

बचत गटांचे कोणत्याही प्रकारचे देयक १० वर्षांपासून प्रलंबित नाहीत. केवळ माहे एप्रिल, २०२२ पासूनची देयके प्रलंबित होती.

केंद्र शासनाने माहे डिसेंबर, २०२१ मध्ये SNA (Single Nodal Agency) प्रणाली सुरू करण्याबाबत कळविले होते. माहे मार्च, २०२२ पर्यंत पुर्वीच्या पध्दतीने देयके अदा करण्याबाबत शिथीलता

देण्यात आलेली होती. त्यानुषंगाने माहे मार्च, २०२२ पर्यंतची देयके पुर्वीच्या पध्दतीने अदा करण्यात आलेली आहेत.

माहे एप्रिल, २०२२ पासून नविन SNA प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या SNA (Single Nodal Agency) प्रणाली नुसार माहे एप्रिल २०२२ पासून पोषण आहाराची देयके अदा करण्यासाठी प्रथम राज्यस्तरावर Single Nodal Account उघडणे, तसेच जिल्हास्तरावर व प्रकल्पस्तरावर योजनानिहाय स्वतंत्र Account उघडणे आवश्यक आहे. तसेच सर्व पुरवठाधारक महिला बचत गटांचे Vender Registration करणे, Vender Registration करण्यासाठी महिला बचत गटांनी पॅन कार्ड, बँक अकाउंट, जी.एस.टी नंबर, Email ID, Phone Registration इ. कागद पत्र प्रकल्प कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तसेच, पुरवठाधारक बचत गटांचे Account SNA प्रणालीमध्ये मॅप करणे इ. प्रक्रिया पार पाडावी लागत असल्याने त्यास काही कालावधी लागत आहे.

पुरवठाधारकांना आयुक्तालयात येण्याची कोणत्याही प्रकारची आवश्यकता नाही. सर्व पुरवठाधारक बचत गटांचे Vender Registration करणे तसेच त्यांचे Account SNA प्रणालीमध्ये मॅप करणे इ. प्रक्रिया जिल्हास्तरावर व प्रकल्पस्तरावर होत आहे.

आहार पुरवठा देयकाकरीता जिल्हास्तर / प्रकल्प स्तरावरून निधी मागणीचा (Limit Set) प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून २४ तासाच्या आत आयुक्तालय स्तरावरुन Limit Set करुन देण्यात येत आहे व त्यानंतर संबंधित बचत गटांच्या खात्यावर तीन दिवसात रक्कम जमा होत आहे.

बचत गटाच्या देयकांसाठी रुपये ९० कोटी निधी राखीव ठेवण्यात आला असून त्यापैकी रुपये ६० कोटी निधी जिल्हास्तर/ प्रकल्पस्तरावर बचत गटांच्या खात्यावर जमा करण्यासाठी SNA प्रणालीद्वारे जमा करण्यात आलेला आहे.

जिल्हास्तर व प्रकल्पस्तरावरुन निधी मागणीचे (Limit Set) प्रस्ताव जस-जसे प्राप्त होत आहेत त्याप्रमाणे प्रस्ताव पारित करुन निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात पोषण अभियानाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२२) * १६१८० श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोषण अभियान राबवित असताना वाढत्या महागाईमुळे केवळ बारा रुपयात लाभार्थ्यांना दोनदा आहार देणे शक्य नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुरक पोषण आहाराचा सन २००६ साली दर प्रतिदिन प्रति लाभार्थी दोन रुपये ठरविण्यात आला, त्यामध्ये वेळोवेळी वाढ करुन २०१७ मध्ये ८ रुपये ते १२ रुपये पर्यंत करण्यात आला होता, हे ही खरे काय,

(३) असल्यास, २०१७ नंतर २०२२ पर्यंत सर्व जीवनाश्यक खाद्य पदार्थांचे यामध्ये गहू, तांदूळ, डाळी, मुग, भाज्या, तेल, पोहे, कुरमुरे आदी वस्तूंचे दर वाढत आहेत, हे ही खरे काय,

(४) असल्यास, २०१७ साली गरम व ताज्या आहाराच्या व टीएचआरच्या दरामध्ये महागाईच्या प्रमाणात वाढ होणे आवश्यक असतानाही ती न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अल्प दरात लाभार्थ्यांना दोनदा आहार मिळावा या उद्देशाने राज्यात पोषण अभियानाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार राज्यात ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील कुपोषित बालके यांना घरपोच आहार तसेच ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालके यांना गरम ताजा आहार सुरु आहे.

पोषण आहाराकरीता केंद्र शासनाने निश्चित केलेला दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | लाभार्थी गट | दर |
|---|---|---|
| १ | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालके | रुपये ८/- प्रति दिन प्रति लाभार्थी |
| २ | गरोदर महिला व स्तनदा माता | रुपये ९.५०/- प्रति दिन प्रति लाभार्थी |
| ३ | ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील कुपोषित बालके | रुपये १२/- प्रति दिन प्रति लाभार्थी |

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) पोषण आहाराचे दर वाढविणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे. महागाईचा वेळोवेळी आढावा घेऊन केंद्र शासनामार्फत पोषण आहाराचे दर निश्चित केले जातात. केंद्राने निश्चित केलेले दर सर्व राज्यांना समान असतात. सदर दरानुसार देयकांची पूर्ती करण्यासाठी केंद्र शासन ५०% तर राज्य शासन ५०% निधी वितरीत करते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील रेवस व परिसरातील ग्रामपंचायतीत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याबाबत

**(२३) * १५१८६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवस (ता.अलिबाग, जि.रायगड) परिसरातील कोप्रोली, मिळखत खार, सारळ, नवखार आणि रेवस या पाच ग्रामपंचायतीत ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे सदर ग्रामपंचायतीच्या सरपंचासह ग्रामस्थांनी दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी पासून अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण आंदोलन सुरू करुन तसेच लेखी आश्वासन देऊनही सदर समस्येचे अद्याप निराकरण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेवस कोळीवाड्यासाठी सन २००८ मध्ये वा त्यादरम्यान भारत निर्माण योजनेंतर्गत रुपये ३३ लाख तसेच सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान रूपये २ लाख ९०९ हजार इतक्या रक्कमेचे दुरूस्तीचे देयक मंजूर होवूनही रेवस (ता.अलिबाग, जि.रायगड) परिसरातील सदर पाच ग्रामपंचायतीमध्ये पाणी पुरविण्यात आले नसतानाही संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमताने ही योजना पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दर्शविण्यात आले असून याबाबत कोकण आयुक्तांनी चौकशीचे आदेश दिले असतानाही अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसल्याचे रेवस ग्रामपंचायतीचे सरपंच श्री.मच्छींद्र पाटील यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने रेवस पाणीपुरवठा योजनेतील झोन एकमध्ये समाविष्ट होणाऱ्या कोप्रोली, मिळखत खार, सारळ, नवखार आणि रेवस या पाच ग्रामपंचायतींना विनाविलंब पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने अथवा केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या जल जीवन मिशन अंतर्गत (जे जे एम) सन २०२४ पर्यंत प्रत्येक ग्रामीण घरात नियमित आणि दीर्घकालीन पुरेशा दाबाने दरडोई किमान ५५ लीटर प्रतिदिन पाणीपुरवठा तातडीने होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) लेखी आश्वासन देण्यात आल्याची बाब खरी नाही.
(२) हे खरे नाही
(३) कोप्रोली, मिळखत खार, सारळ, नवखार व रेवस या ५ गावांकरीता जल जीवन मिशन कार्यक्रमातंर्गत "बोडणी नळ पाणीपुरवठा योजना" मंजूर असून सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच सदर गावाकरीता रेवस झोन १ व झोन २ प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आली असून त्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सद्य:स्थितीत कोप्रोली, मिळखतखार व नवखार या गावांना रेवस झोन क्र.१ प्रादेशिक ग्रामीण पाणीपुरवठा योजनेतून, रेवस या गावास झोन क्र. १ व २ प्रादेशिक ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनेतून नियोजनानुसार व मौजे सारळ येथे विहीर उदभव पूर्ण करून त्याद्वारे तयार नळ पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे स्मारक त्यांच्या जन्मगावी उभारण्याबाबत

**(२४) * १५७७१ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गहुली (ता.पुसद, जि.यवतमाळ) येथे राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे स्मारक उभारण्याबाबत येथील नागरिकांकडून मागणी होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांचे जन्मगावी त्यांचे स्मारक उभारण्याबाबत

कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे संत मुक्ताई मंदिर पर्यटन विकास आराखड्यांतर्गत मंजूर केलेली कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२५) * १५२८८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोथळी (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथे संत मुक्ताई मंदिर पर्यटन विकास आराखड्यांतर्गत मंजूर असलेल्या अम्युझमेंट पार्कची (वॉटरपार्क) कामे गत ५ वर्षापासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे बंद वा अपूर्णावस्थेत असण्याची कारणे काय आहेत व या कामावर आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(३) उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संत मुक्ताई मंदिर पर्यटन विकासासंदर्भातील गत पाच वर्षापासून प्रलंबित असलेली कामे त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) नाही.
(२) व (३) प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये कोथळी येथील अम्युझमेंट पार्कचे बांधकाम करण्याच्या भाग-१ व भाग-२ च्या अनुक्रमे रुपये ४९९.८९ लक्ष व रुपये ४९९.७६ लक्षच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन सदर दोन्ही कामांसाठी अनुक्रमे प्रत्येकी रुपये ५०.०० लक्ष असा एकूण रुपये १००.०० लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. अम्युझमेंट पार्क (भाग-१) चे काम प्रगतीत असून प्रवेशद्वार, प्रवेश कार्यालय, चेजींग रुम, लॉकर व प्रसाधनगृहाचे बांधकाम गिलाव्यासह पूर्ण झाले आहे. तसेच अम्युझमेंट पार्क भाग-२ मधील वावाप्रमाणे माती भरावाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

अम्युझमेंट पार्क (भाग-१) व (भाग-२) मधील कामांसाठी निधीच्या उपलब्धतेनुसार उर्वरित निधी वितरित करण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वात्सल्य मिशन योजनेंतर्गत बालसंगोपन व पंडीता रमाबाई व्याजमाफी योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२६) * १६१०१ श्री.शशिकांत शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२० ते २०२१ या राज्यातील कोरोना-१९ महामारीच्या काळात तरुण वयात जोडीदार गमावलेल्या महिलांच्या मुलांसाठी शासनाने "वात्सल्य मिशन" अंतर्गत बालसंगोपन तसेच पंडीता रमाबाई व्याजमाफी योजना ह्या योजना अंमलात आणून सदर योजनेंतर्गत महिलांना सुरुवातीस रुपये ११००/- इतके अनुदान देण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी या बालसंगोपन योजना अनुदान रक्कमेत वाढ करण्यात येवून सदर रक्कम अडीच हजार रुपये करण्यात येत असल्याचे जाहीर केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालसंगोपन व पंडीता रमाबाई व्याज माफ योजना या दोन्ही योजनांचे शासन निर्णय अद्याप निर्गमित केले नसल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बालसंगोपन योजनेच्या शासनाने जाहीर केलेल्या अडीच हजार रुपये अनुदानाच्या रक्कमेत वाढ करावी तसेच पंडीता रमाबाई व्याज माफ योजनेचा शासन निर्णय निर्गमित करण्यात यावा, अशा आशयाचे निवेदन, महाराष्ट्र राज्य कोरोना एकल महिला पुनर्वसन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याच स्वरुपाच्या योजनेंतर्गत, उत्तर प्रदेश बाल सेवा योजनेंतर्गत प्रतिमहिना चार हजार रुपये, कर्नाटक साडेतीन हजार रुपये, उत्तराखंड वात्सल्य योजनेंतर्गत साडे तीन हजार रुपये, मध्य प्रदेश पाच हजार रुपये तर राजस्थान शासनाकडून पालनहार योजनेंतर्गत वाढीव अनुदान देण्यात येत असताना, राज्य शासनाने त्याबाबतचा अभ्यास करुन निर्णय घेतला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे, तसेच प्रलंबित शासन निर्णयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

० ते १८ वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रीत, बेघर व अन्य प्रकारे आपत्ती असलेल्या बालकांचे संस्थाबाह्य आणि कौटुंबिक वातावरणामध्ये संगोपन व्हावे, यासाठी राज्यामध्ये १९७५ पासून बालसंगोपन योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना रुपये १,१००/- इतके अनुदान देण्यात येत आहे. सद्य:स्थितीत कोरोनामुळे एक किंवा दोन पालक गमावलेल्या बालकांना देखील सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येत आहे.

(२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

(५) तत्कालिन मा.मंत्री (वित्त) यांनी बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानामध्ये अडीच हजार रुपयांपर्यंत वाढ करणेबाबत अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने मा.मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, पंडिता रमाबाई स्मृती शताब्दी महिला उद्योजक योजना राबविण्याबाबत मा.मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील नेट, सेट व पी.एच.डी. अर्हताधारक शिक्षकांना शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत

**(२७) * १५८१५ श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक जर नेट, सेट व पी.एच.डी अहर्ता धारण करीत असतील तर त्यांना प्रशासकीय वर्ग १, वर्ग २ च्या गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य जिल्हा परिषद या पदावर सामावून घेणे बाबत शासनाने राज्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना अहवाल सादर करण्यास सांगितले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेट, सेट व पी.एच.डी. अहर्ता धारण करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद शिक्षकांप्रमाणेच खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील नेट, सेट व पी.एच.डी. अहर्ताधारक शिक्षक यांना शासनाच्या प्रशासकीय वर्ग १ व वर्ग २ च्या गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य जिल्हा परिषद या पदावर सामावून घेणेसाठी शासनाकडे निवेदने प्राप्त झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा परिषद शिक्षकांप्रमाणेच खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील नेट, सेट व पी.एच.डी. अहर्ताधारक शिक्षक यांना शासनाच्या प्रशासकीय वर्ग १ व वर्ग २ च्या गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य जिल्हा परिषद या पदावर सामावून दिनांक ०१/११/२००५ पूर्वी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जिल्हा परिषद शिक्षकांप्रमाणेच खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील नेट, सेट व पी.एच.डी अहर्ताधारक शिक्षकांना शासनाच्या प्रशासकीय वर्ग १ व वर्ग २ च्या गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, प्राचार्य जिल्हा परिषद या पदावर सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. प्रस्तुत प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून माहिती मागविण्यात आली नसून वस्तुस्थिती सादर करण्याबाबत सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांना दिनांक २३/१२/२०२१ च्या पत्रान्वये कळविले होते.

(२), (३) व (४) शिक्षणाधिकारी व तत्सम वर्ग-१ व उपशिक्षणाधिकारी व तत्सम वर्ग-२ संवर्गासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत दिनांक ५/०७/२०१६ च्या अधिसूचनेन्वये सेवाप्रवेश नियमामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर सेवाप्रवेश नियमामध्ये जिल्हा परिषद व खाजगी संवर्गातील नेट-सेट (युजीसी) तसेच पीएचडी अर्हताधारक शिक्षकांना पदोन्नतीसाठी किंवा सामावून घेण्यासाठी कोणतीही तरतुद नाही. त्यामुळे प्रश्न उद्‍भवत नाही.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील महिला व बालकल्याणासाठीच्या राखीव जागांवर अतिक्रमण झाल्याबाबत

**(२८) * १५५४७ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याणासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या राज्य शासनाच्या मुंबईतील मोक्याची ठिकाणी असलेल्या दीडशे एकर जागेवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागांमध्ये चेंबूर, बोरला, मानखुर्द-देवनारमधील १४५ एकर जागेचा समावेश असून, या जागांची कागदपत्रेही गहाळ झाली असून सदर महिला व बालकल्याणासाठीच्या राखीव जागांवर बेकायदा घरे, उद्योग उभारले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महिला व बालकल्याणासाठी असलेल्या जागांवर अतिक्रमणाची कार्यवाही रोखण्यासाठी तसेच अतिक्रमित मुंबईतील जागांची सद्य: स्थिती जाणून त्या ताब्यात घेण्याच्या हेतूने संबंधित विभागाने बैठका घेतल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मुंबई येथील महिला व बालकल्याण विभागाकरीता राखून ठेवण्यात आलेल्या जागेवरील अतिक्रमण रोखून संबंधित दोषींवर कारवाई होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे.

महिला आणि बालकल्याणासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या राज्य शासनाच्या मुंबईतील मोक्याच्या काही जागेवर अतिक्रमण झाले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

महिला व बाल कल्याणासाठीच्या चेंबूर, बोरला, मानखुर्द-देवनारमधील राखीव जागेबाबतची कागदपत्रे गहाळ झाली नसून संस्थेच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. तथापि, येथील काही जागेवर अतिक्रमण करुन बेकायदा घरे, उद्योग उभारले गेले आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) सदर जागेवरील अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तसेच अपर आयुक्त, कोकण विभाग यांचेस्तरावर अपिल दाखल केले असून सदर अतिक्रमण काढण्याबाबत संबंधित विभागांकडे पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोईसर (ता.डहाणू जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या नावाने बोगस दाखले बनवून केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(२९) * १६१०३ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोईसर (ता.डहाणू, जि.पालघर) ग्रामपंचायती अंतर्गत सन २०१५ मध्ये दांडीचा पाडा, काटकर पाडा येथील ग्रामस्थांच्या नावाने गावठाण जागेसाठी बनावट ७ दाखले ग्रामपंचायतीकडून देण्यात आल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बोईसर ग्रामपंचायतीच्या दफ्तरी तसेच आवक-जावक नोंदवहीमध्ये कोणत्याही दाखल्यांची नोंद करण्यात आली नसून, गावठाण दाखल्यांसाठी ग्रामपंचायतीचे लेटरहेड, शिक्के यांचा वापर करुन तत्कालीन ग्रामविकास अधिकाऱ्याच्या बनावट स्वाक्षरीद्वारे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान परप्रांतीय नागरिकांना प्रतिगुंठा ४ लाख रुपये प्रमाणे विक्री करण्यात आल्याचेही माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन त्याबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याबाबतचे आदेश पालघर जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गटविकास अधिकारी,पंचायत समिती,डहाणू यांना दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित गटविकास अधिकारी, डहाणू यांचेकडून त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, अहवाल अद्याप प्राप्त झाला नसल्यास त्याची कारणे काय आहेत, तसेच सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

बोईसर (ता.जि.पालघर) ग्रामपंचायती अंतर्गत सन २०१५ मध्ये दांडीचापाडा, काटकरपाडा येथील ग्रामस्थांच्या नावाने गावठाण जागेसाठी बनावट ७ दाखले ग्रामपंचायतीकडून देण्यात आल्याचे वृत्त दिनांक ६/१०/२०२२ रोजी दैनिक पुढारी या वर्तमान पत्रामध्ये प्रस्ध्दि झालेले आहे.
(२) होय, हे खरे आहे.

बोईसर ग्रामपंचायतीने अशा प्रकारचे दाखले दिलेले असल्याबाबतची सन २०१५-१६ या वर्षाच्या आवक जावक नोंदवहीत नोंद आढळून आली नाही. तसेच अधिकृत लेटरहेड व शिक्के यांचा वापर केलेला नाही. तथापि, बनावट लेटरहेड व शिक्क्यांचा वापर करुन दिनांक १०/०८/२०१७ व २३/११/२०१७ रोजी खरेदी विक्रीच्या व्यवहाराची दस्तनोंदणी झालेबाबत दुय्यम निबंधक पालघर २ यांचेकडील कागदपत्रावरुन दिसून येते.
(३) व (४) हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी गट विकास अधिकारी पंचायत समिती, पालघर यांच्याकडे दिनांक ०६/१२/२०२२ रोजी अहवाला प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार दुय्यम निबंधक पालघर-२ यांचेकडील दस्ताऐवजाची पहाणी केली असता सदर दस्त बनावट गावठाण दाखला व हात नकाशाद्वारे खरेदी व्रिकी झाल्याचे दिसून येते. दस्त नोंदणी करतांना सोबत कोणत्याही प्रकारच्या जमिनीच्या मालकी हक्काचे पुरावे नसताना (उदा.७/१२ उतारा, ग्रामपंचायत नमुना क्र.८ए जागेचा भूमि अभिलेख नकाशा) दुय्यम निबंधक पालघर २ यांनी चुकीच्या पध्दतीने दस्त नोंदविलेले दिसुन येत असून बनावट दाखल्याच्या आधारे खरेदी विक्री झाल्याचे दिसून येत आहे. सदर प्रकरणी संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याबाबत गट विकास

अधिकारी, पालघर यांना कळविण्यात आले आहे. सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पालघर यांना प्रस्तुत प्रकरणी चुकीचा दस्त नोंदणी करणाऱ्या दुय्यम निबंधक पालघर २ यांच्यावर कारवाई करणेसाठी कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार व मोखाडा (जि.पालघर) या आदिवासी तालुक्यांमधील गरोदर मातांना रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) * १६४६७ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार व मोखाडा (जि.पालघर) या आदिवासी बहुल तालुक्यातील आदिवासी भागात नेहमीच गर्भवती मातांना वेळेत रूग्णवाहिका उपलब्ध होत नसल्यामुळे गर्भवती माता व बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील दुर्गम तालुक्यांमध्ये अनेक गाव-पाड्यांना अजूनपर्यंत रस्त्यांची सोय नसल्याने चारचाकी रूग्णवाहिका, खासगी वाहने जाऊ शकत नसल्यामुळे रोटरी क्लब, मुंबई यांनी दोन वर्षापूर्वी दोन बाईक रूग्णवाहिका दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाईक रूग्णवाहिकांचा अद्यापपर्यंत एकही गरोदर मातेला उपयोग झाला नसून त्या वापराविना असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जव्हार व मोखाडा (जि.पालघर) या आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये गरोदर मातांना रुग्णालयात पोहोचण्याकरीता व वेळेत उपचार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) रोटरी क्लब, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या दोन बाईक ॲम्ब्युलन्स प्राथमिक आरोग्य केंद्र, आसे आणि प्राथमिक आरोग्य केंद्र, खोडाळा येथे देण्यात आलेल्या आहेत व त्याचा वापर करण्याच्या सूचना संबंधित वैद्यकीय अधिकारी यांना दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे १०२ व १०८ रुग्णवाहिकेमार्फत गरोदर मातांना वाहन सुविधा मोफत देण्यात येत आहे. वाहन उपलब्ध न झाल्यास मातेस आरोग्य केंद्रापर्यंत आणण्यासाठी तालुका जव्हार व डहाणू अंतर्गत आशा कार्यकर्तींना स्थानिक वाहन करण्यासाठी रक्कम देण्यात येते.

दुर्गम गाव/पाड्यातील गरोदर स्त्रियांना अपेक्षित प्रसूती दिनांकाला प्राथमिक आरोग्य केंद्रात अथवा पोहचण्यास सुलभ गावामध्ये येण्यासाठी समुपदेशन करण्यात येते.

आदिवासी विकास विभागामार्फत सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात पालघर जिल्ह्यातील जव्हार

व मोखाडा तालुक्यात रुपये १०९.४८ कोटी इतक्या किंमतीच्या २२५ रस्ते व पुलांच्या कामांना तसेच रुपये ४१.१५ कोटी इतक्या किंमतीच्या १९६ रस्ते व पुलांच्या दुरुस्तीच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनाथ, निराश्रीत आणि कोरोनामध्ये पालक गमावलेल्या बालकांना बालसंगोपनासाठी जाहीर केलेले अनुदान अद्याप देण्यात आले नसल्याबाबत

**(३१) * १५८४४ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, डॉ.प्रज्ञा सातव, ॲड.अनिल परब, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्याच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात अनाथ, निराश्रित आणि कोरोनामध्ये पालक गमावलेल्या बालकांना बालसंगोपनासाठी जाहीर केलेले प्रत्येकी अडीच हजार रुपयांचे अनुदान अद्याप देण्यात आले नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली असून बालसंगोपनासाठी अडीच हजार रुपये अनुदान वाढीचा प्रस्ताव वित्त विभागाने नामंजूर केल्याने अनाथ, निराश्रित, बेघर बालके, कोरोनामुळे एक किंवा दोन पालक गमावलेली बालके या लाभापासून वंचित राहणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनाथ, निराश्रित आणि कोरोनामध्ये पालक गमावलेल्यांच्या बालसंगोपनासाठी जाहीर केलेले अडीच हजार रुपयांचे अनुदान विद्यमान शासनाने बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बालसंगोपनाच्या अनुदानात इतर राज्याप्रमाणे वाढ करुन राज्यातील अनाथ, निराश्रित व कोरोनामध्ये पालक गमावलेल्या बालकांच्या संगोपनासाठी महत्वाची असलेली सदर योजना बंद पडू नये याकरीता शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) हे खरे नाही.

बालसंगोपन योजनेंतर्गत अनाथ, निराश्रित आणि कोरोनामुळे एक किंवा दोन पालक गमावलेले बालकांना प्रतिलाभार्थी रुपये १,१००/- इतके अनुदान शासनाकडून देण्यात येत आहे.

तत्कालिन मा.मंत्री (वित्त) यांनी बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानामध्ये अडीच हजार रुपयांपर्यंत वाढ करणे बाबतची घोषणा विधीमंडळामध्ये केलेली आहे. सदर घोषणेच्या अनुषंगाने बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत मा.मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन सुरु आहे.

(३) बालसंगोपन योजनेच्या सहायक अनुदानामध्ये वाढीचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळासमोर सादर करण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील बुर्गी व बोटेकसा या प्राथमिक आरोग्य केंद्रांचा समावेश ए-१ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये करण्याबाबत

**(३२) * १५५९८ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुर्गी (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) व बोटेकसा (ता.कोरची, जि.गडचिरोली) ही दोन्ही प्राथमिक आरोग्य केंद्रे अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागात असूनही उक्त केंद्रांचा समावेश ए-३ प्राथमिक आरोग्य केंद्र (ग्रामीण) मध्ये करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दोन्ही केंद्रे नक्षलग्रस्त भागात असल्याने त्यांचा समावेश ए-१ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये करण्यासंबंधी मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी आरोग्य विभागाकडे दिनांक २० जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर दोन्ही केंद्रांचा समावेश ए-१ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्रमांक मवैअ-२०१९/प्र.क्र.१६५/ सेवा-३, दिनांक १९ मार्च, २०१९ मधे ए-३ मध्ये अनुक्रमांक ८३१ वर प्राथमिक आरोग्य केंद्रे, बुर्गी (एटापल्ली) व ८३२ वर प्राथमिक आरोग्य केंद्रे, बोटेकसा (ता.कोरची, जि.गडचिरोली) घोषित केल्या आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) डोके समितीने विचारात घेतलेले निकष व संस्थेच्या मुख्यालयातील उपलब्ध सोयीसुविधा विचारात घेवून त्यानुसार संस्थेचे गुण निश्चित करण्यात येतात. त्यानुसार संस्थेचे वर्गीकरण ए-१ मध्ये होण्यासाठी त्या संस्थेचे ६.१ ते १० गुण मिळणे अपेक्षित आहे. तथापि, उक्त दोन्ही संस्थांना २.२ गुण प्राप्त आहेत. (शासन निर्णय दिनांक १९/०३/२०१९ नुसार) त्यामुळे त्यांचा समावेश ए-१ प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत

**(३३) * १५६९५ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील

गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्धाच्या मुलामुलींकरीता शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती येथे सुरु करण्यात आलेल्या असून सदर संस्थेत ६० कायम व २० तासिका तत्वावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिमाह वेतन अदा करण्यात येत नसल्याने त्यांची आर्थिक गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना प्रतिमाह नियमित वेतन मिळावे याकरीता कर्मचाऱ्यांचे वेतन अनिवार्य लेखाशिर्षामधून करण्याच्या (नॉन प्लान) प्रस्तावावर संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय स्तरावरुन कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कर्मचाऱ्यांचे वेतन लेखाशीर्ष २२२५४१०४ असून त्यांना प्रतिमाह नियमित वेतन मिळावे याकरीता वेतनाचा नॉन प्लान या लेखाशीर्ष मध्ये समावेश केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिमाह वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) वित्त विभागाच्या मान्यतेने सामाजिक न्याय विभागाकडून उपलब्ध निधीच्या मर्यादेत लेखाशीर्ष २२२५४१०४ अंतर्गत सदर कर्मचाऱ्यांचे वेतन/मानधन अदा करण्यात येते. सदर कर्मचारी हे २२२५४१०४ या लेखाशिर्षांतर्गत योजनांतर्गत योजनेमधून अस्थायी कर्मचारी म्हणून कार्यरत असल्यामुळे त्यांचे वेतन/मानधन अनिवार्य लेखाशिर्षामधून देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालगृहांमधील मुलांचे मृत्यू रोखून अन्य सोयी-सुविधांच्या उपाययोजना करण्याबाबत

**(३४) * १५५५१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, नाशिक, नागपूर व इतर जिल्ह्यातील संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना बालगृहामध्ये सुरक्षित आसरा मिळणे गरजेचे असतानाही मुंबईत गत ५ वर्षात शुन्य ते १८ वयोगटातील २० हजार १०३ मुले ही शहर व उपनगरातील बालगृहांमध्ये आली असून पैकी १६,४०० मुले शहर तर ३६९६ मुले ही उपनगरातील बालगृहांमध्ये दाखल झाली असून मुंबई उपनगरातील बालगृहांमध्ये १६ मुलांचा तसेच शासकीय बालगृहांमध्ये गत ५ वर्षात ५० मुलांचा मृत्यू झाल्याचे दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुणात्मक पातळीवर बालगृहांमध्ये कर्मचारी संख्या कमी असून कंत्राटी पध्दतीने

कर्मचाऱ्यांची उपलब्धता करून देणारी एजन्सी सदर कर्मचाऱ्यांच्या वेतनामधील २०% वेतन कापून घेते हे खरे आहे काय तसेच बालगृहांमध्ये असलेल्या मुलांचे शासनाद्वारे सर्वेक्षण करण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, राज्यात नाशिक व नागपूर येथील बालगृहांमधून मुले पळून जाण्याची संख्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक आहे, हे ही खरे आहे काय, तसेच राज्यातील बालगृहांमधून मुले पळून जाण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यातील बालगृहातील असुविधा, अडचणीबाबत तात्काळ न घेतली जाणारी दखल, रॅगिंग इ. बाबींमुळे राज्यात गत ५ वर्षात २६९ मुले बालगृह सोडून गेली आहेत तर १८२ मुले येथून पळुन गेली आहेत, तसेच राज्यातील विवीध बालगृहांत ५० मुलांचा मृत्यू झाला आहे अशी माहिती दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना बालगृहांमध्ये सुरक्षित आसरा मिळावा, बालगृहांत सुरक्षित रहावी व त्यांना येथे राहण्याची आवड निर्माण व्हावी, याकरीता तसेच बालगृहातील मुलांचे मृत्यू रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये ‘पाच वर्षांत ५० मुलांचा बालगृहात मृत्यू’ या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली होती. तसेच, मुंबई उपनगरातील बालगृहांमध्ये गत पाच वर्षामध्ये १० प्रवेशितांचा मृत्यू झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

अशा आशयाची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. तसेच, या विभागांतर्गत कार्यरत बालगृहांची राज्य स्तरीय तपासणी समिती आणि जिल्हा स्तरीय तपासणी समितीकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

गत पाच वर्षामध्ये नाशिक व नागपूर या जिल्ह्यातील संस्थांमधून पळून जाणाऱ्या प्रवेशितांची संख्या अनुक्रमे २१ व १४ इतकी असून बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ या गुन्ह्यातील प्रवेशित तसेच बाल भिक्षेकरी, बालकामगार, अनाथ, निराधार असलेली बालके या संस्थेमध्ये दाखल होतात. ही बालके प्रामुख्याने मुक्त वातावरणामध्ये वास्तव्यास असतात त्यामुळे या बालकांना संस्थेतील बंदीस्त/ शिस्तबध्द वातावरणामध्ये वास्तव्यास राहणे हे त्यांच्या इच्छेविरुध्द असल्यामुळे ही बालके संस्थेतून पळून जाण्याचा वारंवार प्रयत्न करतात.

(४) हे खरे नाही.

बालगृहातील असुविधा, अडचणीबाबत तात्काळ न घेतली जाणारी दखल, रॅगिंग इ. बाबींमुळे बालके बालगृह सोडून अथवा पळून गेलेली नसून गत ५ वर्षात बालगृहामधून न सांगता निघुन गेलेल्या मुलांच्या बाबत पोलीस विभागाकडे तक्रारी (FIR) करण्यात आल्या असून सदर मुलांचा सर्वोतोपरी शोध घेण्यात येत आहे.

(५) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व नियम २०१८ मध्ये नमूद केलेल्या

निकषाची पुर्तता करणाऱ्या संस्थांना मान्यता देण्यात आली असून या संस्थांमधून प्रवेशितांच्या सुरक्षिततेसाठी संरक्षण भिंतीची उंची आवश्यकतेनुसार वाढवणे, पुरेसे सुरक्षा रक्षक उपलब्ध करून देणे तसेच सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे, संस्था परिसरामध्ये तारेचे कुंपन घालणे अशा आवश्यक सुविधा पुरविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, बालगृहामध्ये दाखल असलेल्या मुलांचे मन संस्थेत रमावे यासाठी टि.व्ही, साऊंड सिस्टीम, इनडोअर, आऊट डोअर खेळ, वर्षातुन ३ दिवस चाचा नेहरु बाल महोत्सव, सहल, वेगवेगळया स्पर्धा, सिक्रेट सुपरस्टार (गायन स्पर्धा) समुपदेशन, स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने वेगवेगळे व्यवसाय प्रशिक्षण वर्ग, मनोरंजनाचे कार्यक्रम, इ. चे नियोजन करण्यात येत असते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोद्दार आयुर्वेदिक महाविद्यालयासह अन्य चार शासकीय महाविद्यालयांतील प्रवेशबंदी उठविण्याबाबत

**(३५) * १५११८ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संपूर्ण देशात सद्य:स्थितीत वैद्यकीय अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु असतानाच पोद्दार आयुर्वेदिक महाविद्यालयासह अन्य चार शासकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश बंदी केल्याचे पत्र ‘राष्ट्रीय भारतीय चिकित्सा पध्दती परिषदेने’ पाठविल्याची बाब दिनांक २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाच शासकीय महाविद्यालयांत प्रवेश बंदी करण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदरहू महाविद्यालयांतील प्रवेश बंदी उठविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोगाने दिनांक १९/१०/२०२२ च्या पत्रान्वये संबंधित आयुर्वेदिक महाविद्यालयात काही त्रुटी/कमतरता असल्याच्या कारणास्तव शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम विद्यार्थी प्रवेशासाठी परवानगी नाकारली होती.
(३) राष्ट्रीय आयोगाने नमूद केलेल्या बहुतांश त्रुटींची पूर्तता करण्यात आली आहे. शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील अध्यापकीय पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आल्यानंतर, भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे दिनांक २१/११/२०२२ चे पत्रान्वये राज्यातील मुंबई, नागपूर, नांदेड, उस्मानाबाद व जळगाव येथील एकूण पाच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांनी विद्यार्थी प्रवेशास मान्यता प्रदान केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांसह अन्य पदे रिक्त असल्याबाबत

**(३६) * १५५५७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय**

**ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.रणजित पाटील, प्रा.राम शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: ठाणे, पालघर, रायगड यांसह अनेक जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांत तज्ञ डॉक्टरांसह वैद्यकीय अधिकारी आणि इतर अनेक महत्वाची पदे रिक्त असून रूग्णांच्या आरोग्याची हेळसांड होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तिन्ही जिल्ह्यांतील सर्वाधिक रिक्त पदांची संख्या १९५ इतकी असून यामध्ये ठाणे जिल्ह्यातील सर्वाधिक ८६ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे भरली नसल्याने ग्रामीण तसेच शहरी भागातील रूग्णांची गैरसोय होत असून खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असल्यामुळे आर्थिक समस्या उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा सामान्य रूग्णालय, ग्रामीण आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अनेक तज्ञ वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे अनेक वर्षापासून भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान डॉक्टर्स, परिचारिका, वॉर्डबॉय इ. रुग्णालयातील आवश्यक असणारी मंजूर पदे किती आहेत व त्यापैकी रिक्त पदे किती आहेत, तसेच सर्व संवर्गनिहाय किती पदे रिक्त आहेत,

(६) असल्यास, राज्यातील सर्व शासकीय रूग्णालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच भविष्यात कोरोनासारख्या उद्भवणाऱ्या आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन रुग्णांना अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) शासकीय रुग्णालयात तज्ञ डॉक्टरांसह वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची पदे काही प्रमाणात रिक्त असली तरी, त्याठिकाणी पर्यायी व्यवस्था करुन रुग्णांना आवश्यक आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे रुग्णांच्या आरोग्याची हेळसांड होत आहे, असे म्हणता येणार नाही.

(२) अंशत: खरे आहे. ठाणे, पालघर व रायगड या जिल्ह्यात गट-अ व गट-ब संवर्गांतील एकूण मंजूर १०७९ पदांपैकी २२६ पदे रिक्त आहेत. तर ठाणे जिल्ह्यात एकूण ३७२ मंजूर पदांपैकी ७० पदे रिक्त आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२३) संवर्गातील ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यातील रिक्त पदावर माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आलेली असून, त्यामधील एकूण ३२ अधिकारी हे त्या-त्या संस्थेत रुजू झालेले आहेत.

जिल्हा, उप जिल्हा, तसेच ग्रामीण रुग्णालयातील तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त असली तरी काही संस्थांमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी पूर्ण वेळ तसेच ऑन कॉल बेसिसवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२०) संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी जिल्हास्तरावर गठीत केलेल्या समिती मार्फत कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येते.

(५) ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यातील डॉक्टर्स ची एकूण १०७९ पदे मंजूर असून यापैकी ८५३ पदे भरलेली व २२६ पदे रिक्त आहेत.

परिचारिका यांची एकूण ९७९ पदे मंजूर असून यापैकी ६५५ पदे भरलेली व ३२४ पदे रिक्त आहेत तसेच वॉर्डबॉय यांची एकूण ३३४ पदे मंजूर असून यापैकी १७३ पदे भरलेली व १६१ पदे रिक्त आहेत.

त्याचप्रमाणे ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यातील सर्व संवर्गनिहाय (गट-अ ते गड-ड) मधील एकूण ४४९२ पदे मंजूर असून त्यापैकी ३०५३ पदे भरलेली आहे व १४३९ पदे रिक्त आहेत.

(६) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा/सामान्य राज्य सेवा, गट-अ निवडसूची वर्षात एकूण ३८२ अधिकाऱ्यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सन २०२२-२३ या निवडसुची वर्षात पदोन्नतीच्या कोट्यातील एकूण २९८ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेच्या कोट्यातील एकूण ८८६ पदांच्या जाहिराती प्रसिध्द झालेल्या असून, निवडप्रक्रियेची कार्यवाही आयोगाच्या स्तरावर सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनस्तर एस-२०) मधील नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने एम.बी.बी.एस/बी.ए.एम.एस अर्हताधारकांमधून वैद्यकीय अधिकारी भरण्याबाबत जिल्हास्तरावर निर्देश देण्यात आलेले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी गट-अ यांची १०० टक्के पदभरतीची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

त्याचप्रमाणे प्रशासकीय अधिकारी संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील एकूण ३५ पदे व सांख्यिकी अधिकारी संवर्गातील एकूण १६ पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड संवर्गाची सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांची परीक्षा घेण्यासाठी एजन्सी निश्चित करुन पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच भविष्यात कोरोना सारख्या उद्भवणाऱ्या आपत्तीना तोंड देण्यासाठी राज्यातील साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी लागणारी औषधे व साधनसामग्री खरेदी करण्यासाठी साथरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत लेखाशीर्ष २२१० ४२८६ या लेखाशीर्षाखाली पुरेसा निधी उपलब्ध करण्यात येतो. दरवर्षी राज्यातील साथरोग परिस्थिती लक्षात घेऊन त्यानुसार वाढीव निधीची मागणी नोंदविण्यात येते. याशिवाय अचानक उद्भवणाऱ्या साथरोग उद्रेकासाठी पुरवणी मागणी व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमार्फत निधी उपलब्ध करण्यात येतो. याशिवाय राज्यातील साथरोग नियंत्रण व प्रतिबंधासाठी नियमित सर्वेक्षण, प्रयोगशाळांचे विस्तारीत जाळे, औषधे व साधनसामुग्रीची पुरेशी उपलब्धता, रुग्णालयीन व्यवस्था आणि आरोग्य शिक्षण या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतो.

-----------------

## जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या उन्हाळी सुट्टीत करण्याबाबत

**(३७) * १६५६८ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांची प्रक्रिया ही ग्रामविकास विभागाने दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२

रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयानुसार सुरु झालेली असून महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील बदली अधिनियमानुसार जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या फक्त दीर्घ उन्हाळी सुट्टीतच कराव्यात असे नियम आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्यांचे ग्रामविकास विभागाकडून जाहीर झालेल्या वेळापत्रकानुसार बदल्यांची कार्यवाही सुरू असून विद्यार्थ्यांच्या अध्ययनांच्या तसेच प्रशासकीय समस्या उद्भवू शकतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोविड साथीमुळे शाळांच्या संच मान्यता झालेल्या नसून सन २०१८-२०१९ ते सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी पटसंख्येत मोठ्या प्रमाणात झालेल्या बदलांमुळे सन २०२२-२०२३ ची संचमान्यता करण्याकरीता समायोजनाच्या नियमानुसार जून महिन्यानंतर शाळेत आलेल्या शिक्षकांना अतिरिक्त ठरविले जाते व त्या शिक्षकांनाच अतिरिक्त ठरवून त्यांचे समायोजन केले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शिक्षकांच्या बदल्या राजपत्रातील अधिनियमाप्रमाणे उन्हाळी दीर्घ सुट्टीतच कराव्यात व तत्पुर्वी संचमान्यता करुन त्यानुसारच शिक्षकांचे समायोजन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी दिनांक ०७/०४/२०२१ च्या शासन निर्णयान्वये सुधारित धोरण विहित करण्यात आले असून सदर धोरणात जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या सामान्यपणे वर्षातून एकदाच दिनांक १ मे ते ३१ मे पर्यंत करण्यात याव्यात, असे नमूद आहे. सदर धोरणातील तरतूदीनुसार सन २०२२ मधील जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांच्या कार्यवाही बाबत शासनपत्र दिनांक २१/१०/२०२२ अन्वये सुधारित वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.
(३) सन २०२२-२३ च्या संचमान्यतेकरीता दिनांक ३०/०९/२०२२ ऐवजी दिनांक ३०/११/२०२२ रोजीची विद्यार्थी संख्या विचारात घेण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक २३/११/२०२२ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(४) सद्य:स्थितीत जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांची कार्यवाही सुरु असल्याने संचमान्यतेमुळे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन / पदस्थापना सदर ऑनलाईन बदली प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर करण्यात यावे, अशा सूचना दिनांक १०/०६/२०२२ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोल्हापुर येथे जिल्हा क्रीडा संकुलाची निर्मिती करण्याबाबत

**(३८) * १५७१० श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील

काय :-

(१) कोल्हापुरात जिल्हा क्रीडा संकुलाची निर्मिती तातडीने होणे गरजेचे असल्याने कोल्हापूर शहराजवळील शेंडा पार्क येथील २५ एकर जागा उपलब्ध करण्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही व्हावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने क्रीडा संकुलासाठी त्वरित जागा उपलब्ध करण्यासाठी उक्त प्रस्तावाला मंजुरी देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्हा क्रीडा संकुल निर्मितीकरीता कोल्हापूर शहर येथील शेंडापार्क येथील गट नं. ६००, ६०१, ६०२ येथील २५ एकर जागा उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ६० वर्षावरील सर्व नागरिकांकरीता महात्मा फुले जन आरोग्य योजना लागू करणेबाबत

**(३९) * १५९३७ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ६० वर्षावरील सर्व स्त्री-पुरुष ज्येष्ठ नागरिकांना महात्मा फुले जन आरोग्य ही योजना सरसकट लागू करून आरोग्य विमा सुरू करावा अशी मागणी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने महाराष्ट्र शासनास करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ६० वर्षावरील सर्वांना सरसकट आरोग्य विमा योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम) यांनी दिनांक १८/०१/२०२१ रोजी तत्कालीन उप मुख्यमंत्री यांना निवेदन सादर केले होते.

(२) याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ग्रामविकास विभागाची ८५० कोटी रुपयांची मंजूर कामे रद्द केल्याबाबत

**(४०) * १६१९२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात मूलभूत सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी तत्कालीन शासनाने मंजूर केलेली सुमारे ८५० कोटींची कामे रद्द केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण भागातील नागरिक सोयी-सुविधांपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामविकास विभागातील रद्द केलेली कामे तातडीने मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर रद्द कामांतून रुपये २९३.०० कोटी रक्कमेची कामे वगळण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हा सामान्य रूग्णालयातील अपंग प्रमाणपत्र वितरणातील गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत

**(४१) * १५९७२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत परभणी जिल्हा सामान्य रूग्णालयातील अधिकाऱ्यांनी ४२ जणांची लाखो रूपये घेवून बोगस अपंग प्रमाणपत्र देऊन, अपात्रांना पात्र बनवून लाभ दिल्याप्रकरणी झालेल्या तक्रारीवरून आरोग्य उपसंचालक, औरंगाबाद यांनी सहा सदस्यांची त्रिस्तरीय चौकशी समिती सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने जिल्हा रूग्णालयातील गैरप्रकाराची चौकशी करून उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांच्याकडे अहवाल सादर केला आहे काय व त्याची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बोगस प्रमाणपत्र देणारे अधिकारी तसेच, बोगस प्रमाणपत्राचा लाभ घेवून फायदा मिळविणारे संबंधितांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) व (२) परभणी जिल्हा रुग्णालयाकडून बोगस अपंग प्रमाणपत्र वितरण केल्याबाबत व महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ४२ अधिकारी व कर्मचारी यांच्या भरती अनियमिततेबाबत अशा दोन स्वतंत्र तक्रारी आहेत.

परभणी जिल्हा रुग्णालयाकडून बोगस अपंग प्रमाणपत्र वितरण केल्याबाबतच्या तक्रारीच्या

अनुषंगाने चौकशी अहवाल दिनांक १०/०६/२०२२ च्या पत्रान्वये उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांनी आयुक्तालयास सादर केला आहे.

महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ४२ अधिकारी व कर्मचारी यांच्या भरती अनियमिततेबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समिती गठीत करण्यात आलेली असून चौकशी सुरु आहे.

(३) अपंग प्रमाणपत्र प्रकरणी उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक, परभणी यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यांत आली आहे.

तसेच गैरमार्गाने प्रमाणपत्र वितरीत करणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन त्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी पोलीस स्टेशन नानलपेठ, परभणी येथे गुरनं १४५/२०२१, दिनांक ३१/०३/२०२१ अन्वये भादंवि ४२०, ४६८, ४७१, ६५, ७३, ७४ अन्वये गुन्हा दाखल केलेला असून सदरील प्रकरण अन्वेषाधीन आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील कुर्झे प्राथमिक आरोग्य केंद्रासह अन्य प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालयांमध्ये सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(४२) * १५२२७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर-कुर्झे (ता.जि.पालघर) या गावातील कु. प्रताप महेश तांबडे या साडेपाच वर्षीय बालकाचा सर्पदंशावरील उपचाराकरीता आवश्यक सोयी-सुविधा वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे मृत्यू झाला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुर्झे प्राथमिक आरोग्य केंद्रातून बालकाच्या उपचाराकरीता ऑक्सीजन तसेच सोबत परिचारिका पाठविणे अपेक्षित असताना तसे न झाल्याने सदर मुलाचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यामधील नागरिकांना सर्पदंशावर वेळेत उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाल्याच्या घटना घडूनही जिल्ह्यातील बहुतांश रुग्णालयात अद्यापही सर्पदंशावर उपचार करण्यास आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खेडोपाडी, वाडी-वस्तीवर, राना-माळावर वस्ती असूनही प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालयांना अत्याधुनिक सुविधा, तज्ञ डॉक्टर, डायग्नोस्टिक सेंटर इ. सुविधा पुरविल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील तसेच पालघर जिल्ह्यातील कुर्झे प्राथमिक आरोग्य केंद्रासह इतर प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच ग्रामीण रुग्णालयात अद्ययावत आरोग्य सुविधा तातडीने पुरविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

कु.प्रताप महेश तांबडे या साडेपाच वर्षीय बालकाला प्राथमिक आरोग्य केंद्र, कुर्झे येथे दिनांक २०/१०/२०२२ रोजी ११.५८ वाजता आणले असता कानाला काहीतरी चावले असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार सदर रुग्णावर तात्काळ प्राथमिक उपचार करुन ग्रामीण रुग्णालय, विक्रमगड येथे संदर्भित करण्यात आले. ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णाची तपासणी व चाचणी करण्यात आली, चाचणीमध्ये न्यूरोटॉक्झिक प्रकारचा अतिविषारी संर्पदंश झाल्याचे लक्षात आले. त्यानुसार आवश्यक औषधोपचार (inj ASV, inj Atropin, inj Neostigamin) देऊन उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे संदर्भित करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय, जव्हार येथे कर्तव्यावर असलेले बालरोग तज्ञ यांनी तात्काळ intubate करुन रुग्णास कृत्रिम श्वसन यंत्रणेवर ठेवून आवश्यक ते उपचार केले. रुग्णाची परिस्थिती गंभीर असल्याने आवश्यक प्रतिसाद मिळाला नाही व सदर बालकाचा रात्री ०३ वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला.

(२) हे खरे नाही. सदर रुग्णाची प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी केली असता, रुग्ण सर्व सूचनांचे पालन करत होता, रुग्णाच्या नाडीचे ठोके व्यवस्थित होते. त्यामुळे ऑक्सीजनची आवश्यकता नसल्यामुळे ऑक्सीजन लावण्यात आले नाही तसेच सदर रुग्णासोबत रुग्णवाहिकेमध्ये कर्तव्यावर कार्यरत असलेल्या अधिपरिचारिकेस (जी. एन.एम.) यांना सोबत पाठविण्यात आले होते.

(३) हे खरे नाही. पालघर जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयामध्ये आवश्यक असलेले ASV औषध उपलब्ध आहे. तसेच सर्व ठिकाणी उपचार करण्यासाठी वैद्यकीय अधिकारी इतर सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

तसेच जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये येथे सन २०२१-२०२२ मध्ये सर्पदंशावरील २३९१ रुग्णांवर व सन २०२२-२०२३ (माहे ऑक्टोबर, २०२२) मध्ये २२३३ सर्पदंशावरील रुग्णांवर उपचार करण्यात आले.

तसेच जिल्हा परिषद यांच्या अधिपत्याखालील ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रामधे सन २०२१-२०२२ मध्ये सर्पदंशावरील २०१८ रुग्णांवर व सन २०२२-२०२३ मध्ये १५८६ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.

(४) हे खरे नाही. जिल्ह्यामध्ये ०१ जिल्हा रुग्णालय, ०३ उपजिल्हा रुग्णालये, ०९ ग्रामीण रुग्णालये, ४६ प्राथमिक आरोग्य केंद्र, ०१ जिल्हा परिषद दवाखाना, ०३ प्राथमिक आरोग्य पथके व ०७ भरारी पथके कार्यरत आहेत. सदर आरोग्य संस्थेमध्ये निकषाप्रमाणे वैद्यकीय अधिकारी व तज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करण्यात येते. सदर आरोग्य संस्थामध्ये आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध असून त्यामार्फत आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सरपंच व उपसरपंच यांच्या मानधन वाटपातील अनियमिततेबाबत

**(४३) * १६०६१ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अरुण लाड, श्री.सचिन अहिर, डॉ.सुधीर तांबे, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील

काय :-

(१) अखिल भारतीय सरपंच परिषदेच्या शिर्डी (जि.अहमदनगर) येथे झालेल्या अधिवेशनात सरपंच व उपसरंपच यांना मानधन म्हणून सरसकट पाच हजार रुपये देण्याची घोषणा शासनाने माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरसकट पाच हजार रुपये मानधन देण्याऐवजी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लहान, मध्यम आणि मोठ्या ग्रामपंचायती अशी वर्गवारी करुन त्या वर्गवारीनुसार मानधनाचे रकमेत फरक करुन त्यानुसार अनुदान अदा करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीच्या संगणक परिचालकावर मानधन विषयक माहिती संकलित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली असून परिचालकांनी दरमहा मानधनाची मागणी केल्यामुळे उक्त मानधनाची माहिती पंचायत समिती, जिल्हा परिषद, राष्ट्रीय स्वराज्य अभियान त्यानंतर बँकेत पाठविली जाणे यास्तव गत सहा महिन्यापासून २५ हजार सरपंच व उपसरपंच (महिला सरपंच व उपसरपंच सह) यांना मानधन देण्यात आले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने घोषित केल्यानुसार, ग्रामपंचायतीच्या वर्गवारीनुसार मानधनाचे रकमेत फरक न करता सरसकट रुपये ५ हजार मानधन रक्कम वाटपात सुसुत्रता आणावी अशी मागणी सरपंच व उपसरपंच परिषदेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सरपंच उपसरपंच यांना नियमित मानधन उपलब्ध करून देण्यासाठी गट विकास अधिकारी यांचे स्तरावर एक निश्चित लेखाशीर्ष उपलब्ध करून देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सरपंच व उपसरपंच यांना देण्यात येणाऱ्या मानधन रक्कम वाटपातील सुसुत्रता अमलात आणून त्यांना सरसकट पाच हजार रुपये मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

दिनांक ३०/०७/२०१९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र राज्यातील सर्व ग्रामपंचायतीच्या सरपंचांचे मानधन वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला असून उपसरपंचानाही मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ग्रामपंचायतीच्या सरपंचाचे व उपसरपंचाचे मानधन ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येनुसार वर्गवारी करुन वाढविण्याचा निर्णय व्हीपीएम-२०१९/प्र.क्र.२५५/पंरा-३, दिनांक ३० जुलै, २०१९ या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

(३), (४) व (५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे व कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये जल जीवन मिशन योजनेंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४४) * १६३८९ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या जल जीवन मिशन योजनेंतर्गत कोल्हापूर जिल्ह्यात मंजूर झालेल्या १,२६४ व पुणे जिल्ह्यातील ९०० पाणीपुरवठा योजनांत कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यासह कोल्हापूर जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेतील गैरव्यवहाराबाबत श्वेतपत्रिका काढण्याचे आदेश शासनाने दिले आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर योजनांमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराप्रकरणी पुणे व कोल्हापूर जिल्ह्याची श्वेतपत्रिका काढून दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे धामापूर (खालचावाडा) ते आंबेरी या संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४५) * १६०१९ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक ७८३५ ला दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धामापूर (खालचा वाडा) ते आंबेरी (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) या ६.५ कि.मी. लांबीच्या ग्रामीण मार्ग क्रमांक ४०२ रस्त्याच्या मजबूतीकरणासह डांबरीकरणासाठी शासनाने माहे डिसेंबर, २०१९ अखेर ४३०.३५ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देऊन सा.क्र.०/०० ते १/५०० मधील रस्ता दुरुस्तीचे काम विविध योजनेंतर्गत प्राधान्याने प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग (सा.बां.) यांना सूचना देऊनही काम अद्यापपर्यंत हाती न घेतल्याने अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संपूर्ण रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मौजे धामापूर (खालचावाडा) ते आंबेरी या संपूर्ण रस्त्याचे मजबूतीकरणासह डांबरीकरणाचे काम पूर्ण करुन ग्रामस्थांना एस.टी.वाहतूक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ अंतर्गत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील पॅकेज क्रमांक SIN-१४ मधील चौके बावखोल आंबेरी धामापूर रस्ता (ता.मालवण) या रस्त्याच्या ६.५ कि.मी. लांबीच्या व रुपये

४३०.३५ लक्ष किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामामध्ये ग्रामा-४०२ (१/८०० ते ३/००=१.२ कि.मी.) व ग्रामा-४०८ (०/०० ते ५/३००=५.३ कि.मी.) अशी लांबी समाविष्ट आहे.

प्रस्तुत कामामध्ये ग्रामा-४०२ रस्त्याची सा.क्र.०/०० ते १/५०० ही लांबी समाविष्ट नाही.

(२) व (३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत मंजूर ६.५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम फेब्रुवारी-२०२० मध्ये पूर्ण झाले असून सदर लांबी सुस्थितीत व वाहतुकीस योग्य आहे. सदर रस्त्याच्या ०/०० ते ४/०० या लांबीमध्ये आंबेरी गावापर्यंत एस.टी. वाहतूक सुरु आहे.

ग्रामा-४०२ रस्त्यावरील ०/०० ते १/८०० लांबीचा डांबरी पृष्ठभाग खराब झाला असून, नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सदरचे काम जिल्हा परिषदेस रस्ते दुरुस्तीच्या विविध योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून प्राथम्याने हाती घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेस देण्यात आल्या आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदरचे काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एकदरा गावातील गोमुख पाडा (ता.मुरुड, जि.रायगड) येथे पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

**(४६) * १५६७५ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकदरा गावातील गोमुख पाडा भागातील (ता.मुरुड, जि.रायगड) ग्रामस्थांना अनेक वर्षांपासून महिन्यांतून केवळ एकदाच पाणीपुरवठा होत असून पिण्याच्या पाण्यासाठी रुपये ३५० ते ४०० एवढी रक्कम खर्च करून पाणी विकत घ्यावे लागत असल्यामुळे एकदरा ग्रामपंचायतीने गत ३ वर्षापासून सातत्याने मा.पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री, मा.पालकमंत्री, रायगड, जिल्हाधिकारी, रायगड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. रायगड यांच्याकडे ग्रामपंचायतीचे ठराव पारित करून लेखी निवेदन सादर केलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणीटंचाईच्या समस्येमुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी गट विकास अधिकारी, श्री.सुभाष वाणी यांच्याकडे निवेदने तसेच आंदोलने करुनही पंचायत समितीमार्फत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यामुळे ग्रामस्थांनी पुनश्च माहे ऑक्टोबर, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने एकदरा (ता.मुरुड, जि.रायगड) गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई विनाविलंब दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) एकदरा ग्रामस्थांनी दिनांक ०७/१०/२०२२ रोजी पंचायत समिती, मुरुड, जि.रायगड कार्यालयास निवेदन दिलेले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना गट विकास अधिकारी, पंचायत समिती मुरुड यांनी दिल्या होत्या. दिनांक

०५/१०/२०२२ व दिनांक ०६/१०/२०२२ रोजी एकदरा नळ पाणीपुरवठा योजनेची पाईप लाईन गळती झाल्यामुळे गायमुख पाड्यासह पूर्ण एकदरा गावास दोन दिवस पाणीपुरवठा अत्यंत कमी दाबाने सुरु होता. तथापि, ग्रामपंचायतीने तात्काळ सदर पाईप लाईन गळती दुरुस्ती केली व पाणीपुरवठा सुरळीत केला आहे.
(३) सदर गावातील पाणी टंचाई दूर करण्याकरीता रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडून जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत एकदरा नळ पाणीपुरवठा योजना मंजूर झालेली असून दिनांक १३/१०/२०२२ अन्वये योजनेस कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखली (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथे भारत निर्माण योजनेंतर्गत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(४७) * १६५११ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) येथे भारत निर्माण योजनेंतर्गत गैरव्यवहार केलेल्या संबंधितांविरुध्द कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद,जळगाव यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश गट विकास अधिकारी, जळगाव यांना दिलेले असूनही संबंधितांवर गुन्हे दाखल झाले नसल्याबाबतचे लेखी निवेदन तेथील लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.

उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद उप विभाग, मुक्ताईनगर यांचा चौकशी अधिकारी म्हणून प्राधिकृत केल्यानुसार त्यांनी चौकशी केली असून, त्यात समितीने केलेले कामाचे घेतलेले देयक व प्रत्यक्षात आढळून आलेल्या कामानुसार रक्कम रुपये १६,९२,०६८/- तफावत आढळून आली आहे.

त्यानुसार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद जळगांव यांनी दिनांक २७/०७/२०२२ रोजीच्या पत्रान्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुक्ताईनगर यांना चौकशी अहवालाप्रमाणे रक्कम रुपये १६,९२,०६८/- ही संबंधित तांत्रिक सेवा पुरवठादार, तत्कालीन अध्यक्ष व सचिव व सर्व तत्कालीन ग्राम पाणीपुरवठा स्वच्छता समिती चिखली ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव यांचेकडून वसूल करण्याबाबत तसेच वसुलीस प्रतिसाद न मिळाल्यास आर.आर.सी. किंवा फौजदारी कारवाई करण्याबाबत कळविलेले होते.

ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, चिखली ग्रामपंचायतचे तत्कालीन सदस्य यांनी आम्ही पाणीपुरवठा समितीचे सदस्य अथवा लाभार्थी नाही व माझ्या बनावट सह्यांचे कागदपत्र व दस्तऐवज तयार केलेले आहे असा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यामुळे या सर्व बाबींची चौकशीचे काम प्रगतीत

आहे.

(३) ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, चिखली ग्रामपंचायतचे तत्कालीन सदस्य यांनी चौकशी नंतर पुन्हा नवीन बाबी उपस्थित झाल्याने या बाबींची चौकशी गट विकास अधिकारी स्तरावर प्रगतीत असल्याने विलंब होत आहे.

-----------------

## टाकळी अंतूर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक शाळेच्या धोकादायक इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(४८) * १६३९५ श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकळी अंतूर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील जि.प.प्राथमिक शाळेच्या इमारतीची दयनीय अवस्था झाली असून येथील वर्गखोल्या धोकादायक झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या बाहेर ज्ञानार्जन करण्याची वेळ आली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाकळी अंतूर येथे जिल्हा परिषदेची पहिली ते चौथी पर्यंतची शाळा असून येथे अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषद शिक्षण विभागाने गत अनेक वर्षापासून या शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्याने या वर्ग खोल्या मोडकळीस आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, टाकळी अंतूर येथील शाळेसह मराठवाड्यातील निजामकालीन सर्व शाळांची दुरुस्ती देखभाल किंवा नव्याने शाळा बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## शासकीय नर्सिंग महाविद्यालयांमधील पाठ्यनिदेशिका या पदावर सरळसेवेने निवड झालेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत

**(४९) * १६३४९ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय नर्सिंग महाविद्यालयामध्ये सिस्टर (नर्सिंग शिक्षक) अर्थात पाठयनिदेशिका या पदावर निवड होऊनही सरळसेवेने गुणवत्ता यादीत आलेल्या १५१ उमेदवारांना गेल्या तीन वर्षापासून अद्याप नियुक्ती देण्यात आली नसल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे

आहे काय,
(२) असल्यास, पाठयनिदेशिकांना नियुक्ती देण्याबाबत मॅट, मुंबई व मॅट औरंगाबादने अंतिम निर्णय देऊनही मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी आदेश देऊन देखील सदर पाठयनिदेशिका उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नियुक्ती न देण्याप्रकरणी सदर उमेदवारांच्या संघटनेच्यावतीने मा.मुख्यमंत्री तसेच मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे तक्रार निवेदन देण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार त्याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
दिनांक ०६/०६/२०२२ रोजीच्या मा.न्यायनिर्णयानुसार, गुणवत्ताधारक उमेदवारांना नियुक्ती देणेबाबत शासन पत्र क्र.न्यायिक२०१९/प्र.क्र.१००/सेवा-५ दिनांक १७/१०/२०२२ नुसार मान्यता प्रदान करण्यात आली. त्यानुसार गुणवत्ता धारक उमेदवारांची समुपदेशन प्रकिया दिनांक १६/११/२०२२ रोजी आयुक्तालय स्तरावरुन पूर्ण होऊन पात्र ठरलेल्या एकूण ६२ (सर्वसाधारण प्रवर्गातील) उमेदवारांना नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
तसेच उर्वरीत उमेदवारांचे नियुक्तीबाबत कागदपत्रे संबंधित प्राधिकरणाकडे पडताळणीस पाठविण्यात आलेले आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर प्रकरण न्यायप्रविष्ट होते. या पदाच्या सरळसेवेच्या निकालानुसार गुणवत्ता यादी जाहीर होणे व न्यायनिर्णयाचा दिनांक यामध्ये एक वर्षाचा कालावधी झाल्याने विहीत शासन मान्यता घेवून समुपदेशन प्रक्रिया करण्यात आली.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात देवदासी या कुप्रथेस कायद्याने बंदी असतानाही विविध मंदिरातून महिलांना देवदासी बनविणे सुरु असल्याबाबत

**(५०) * १५८५७ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात देवदासी कुप्रथेबाबत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्र, कर्नाटकसह सहा राज्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायद्याने बंदी असताना या राज्यातील विविध मंदिरातून महिलांना देवदासी बनविणे सुरु असल्याबाबत मानवाधिकार आयोगाने विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

त्यानुषंगाने देवदासी कुप्रथा बंद करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) होय.

(३) व (४) महाराष्ट्र शासनाने देवदासी प्रथा (नाहिशी करणे) अधिनियम २००५ हा दिनांक ३१/०३/२००८ पासून राज्यात लागू केलेला आहे. त्यानुसार मुली/महिलांना देवदासी म्हणून समर्पीत करण्यास बंदी आहे.

देवदासी प्रथा (नाहिशी करणे) अधिनियम २००५ पारीत होण्यापुर्वी महाराष्ट्रात प्रामुख्याने कर्नाटक राज्यालगतच्या जिल्हयांमध्ये म्हणजेच कोल्हापूर परिक्षेत्रातील जिल्हयांमध्ये देवदासी आढळून येत होत्या. सद्य:स्थितीत सन २००८ नंतर देवदासी बनविण्याच्या/ झाल्याच्या कोणत्याही घटनांची नोंद पोलीस विभागाकडे झालेली नसलेबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र यांचेकडून लेखी स्वरुपात दिनांक ०२/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

याबाबतचा अहवाल शासनाच्या दिनांक २४/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, नवी दिल्ली यांना सादर केला आहे.

-----------------

## हाफकिन बायोफार्मा महामंडळाच्या ग्लोव्हज खरेदीतील अनियमिततेबाबत

**(५१) * १५६३४ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाफकिन बायोफार्मा महामंडळाने सन २०२०-२१, सन २०२१-२२, सन २०२२-२३ या तीन वर्षांत एक कोटी वैद्यकीय ग्लोव्हज (जोडी) चढ्या दराने खरेदी केली असल्यामुळे शासनाचा रुपये २० कोटीहून अधिक निधी खर्च होवून सुमारे आठ कोटी रुपयांचा आर्थिक भार पडला असल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी हाफकिन महामंडळाला कोणत्याही उत्पादनांची खरेदी करायची असेल, तर ठराविक उत्पादनाचा बाजारभाव काय आहे आणि इतर सरकारी यंत्रणांमध्ये त्याच उत्पादनांची असलेली गुणवत्ता किंमत इत्यादी बाबींचा तुलनात्मक अभ्यास करून निविदा प्रक्रियेला अंतिम स्वरूप द्यावे ह्या शासनाने दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निदेशांचे उल्लंघन करुन चढया दराने ग्लोव्हज ची खरेदी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे आणि त्यानुषंगाने घटनेची सत्यता पडताळून शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन न करता सलग तीन वर्षे चढ्या दराने ग्लोव्हज (जोडी) खरेदी करणाऱ्या संबंधित हाफकिन बायोफार्मा महामंडळातील दोषी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१), (२) व (३) वैदयकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांकरीता ग्लोव्हज खरेदी करण्यासाठी शासनाने दिलेल्या प्रशासकीय मान्यतेनंतर विविध ग्लोव्हजच्या विनिर्देशनामध्ये (specification) बदल करण्यात आल्याने ग्लोव्हजच्या खरेदीच्या दरात वाढ झाल्याचे

निदर्शनास आले आहे.

सदर प्रकरणी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून खुलासा मागविण्याचे निर्देश आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन महामंडळ यांना देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील द यश फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग मेडिकल व रिसर्च इन्स्टिट्यूटकडून विद्यार्थ्यांच्या झालेल्या फसवणुकीबाबत

**(५२) * १५५६५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील द यश फाउंडेशनच्या कॉलेज ऑफ नर्सिंग मेडिकल व रिसर्च इन्स्टिट्यूट मध्ये जी एन एम अभ्यासक्रमासाठी ३० विद्यार्थ्यांची क्षमता असताना सन २०२१ या शैक्षणिक वर्षात ४७ विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन १७ विद्यार्थ्यांना परीक्षेपासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे एक शैक्षणिक वर्ष वाया गेले आहे तसेच वार्षिक दीड लाख रुपये फी घेऊन सदर विद्यार्थ्यांची महाविद्यालयाने फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, होस्टेलची फी घेऊन विद्यार्थ्यांना लॉजवर वास्तव्याला ठेवण्यात आल्याचे व सदर कॉलेज मार्फत विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात लूट सुरू असून, विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या जेवणात अळ्या सापडल्याने विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे तक्रार करण्यात आली असून, याबाबत सदर संस्थेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

## पालघर जिल्ह्यातील अंगणवाड्यांना एकात्मिक बालविकास सेवायोजनेंतर्गत निकृष्ट दर्जाचे धान्य पुरविण्यात येत असल्याबाबत

**(५३) * १६४३९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील अंगणवाड्यांमध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजनेतंर्गत बालकांना गरम ताजा सकस आहार देण्यासाठी शासनाकडून पुरविण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्यान्ह भोजन आहाराच्या नावाखाली किडक्या धान्याद्वारे तयार केलेला आहार बालकांना दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी करण्याची मागणी ‘समर्थन’ संस्थेने दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा

त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, महिला व बालविकास, प्रधान सचिव, महिला व बालविकास, सचिव, आदिवासी विभाग यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली असल्यास चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अंगणवाड्यांमधील बालकांना चांगला आहार उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) हे खरे नाही.

एकात्मिक बालविकास सेवा योजना, प्रकल्प कार्यालय मनोर, ता.पालघर येथील एक अंगणवाडी मध्ये दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी दैनिक लोकसत्ता मध्ये चना खराब असल्याबाबतची बातमी प्रकाशित झाली होती. त्या अनुषंगाने चौकशी केली असता अंगणवाडीतील लाभार्थ्यांचे पालक यांची भेट घेतली असून चना चांगल्या प्रतीचा असल्याबाबत तसेच भेटीच्या वेळेस बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी चना चांगल्या प्रतीचा असल्याबाबत खात्री केली आहे.
(३) हे खरे आहे.

सदर प्रकरणाची चौकशी केली असून पालघर जिल्ह्यामध्ये ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी तसेच गरोदर महिला व स्तनदा माता यांना चांगल्या प्रतीचा घरपोच आहार पुरवठा करण्यात येत आहे. तसेच ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना योग्य प्रतीचा गरम ताजा आहार पुरवठा नियमित सुरू आहे. ज्या ठिकाणी स्थानिक महिला मंडळांनी आहार पुरवठा करण्यास नकार दिला आहे त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य कन्झ्युमर्स फेडरेशन मार्फत कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा करण्यात येतो व कच्चे धान्य व किराणा मालाचा पुरवठा झाल्यानंतर अंगणवाडी सेविका स्वतः आहार शिजवून लाभार्थ्यांना वितरीत करते.
(४) पुरक पोषण आहाराचा पुरवठा नियमितपणे सुरू आहे. तसेच, सदर आहारामध्ये केंद्र शासनाच्या नियमानुसार आवश्यक पोषकतत्वे उदा. कॅलरीज, विटॅमीन, प्रोटिन इ. उपलब्ध आहेत. सदर आहाराचे नियमानुसार प्रयोगशाळेत तपासणी करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रघुजीनगर (ता.जि.नागपूर) येथील कामगार कल्याण मंडळाच्या बंद असलेल्या जलतरण तलावाकरीता सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५४) * १६४१४ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रघुजीनगर (ता.जि.नागपूर) येथील कामगार कल्याण मंडळाच्या जलतरण तलावात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जलतरणपटूंनी प्रशिक्षण घेतले असून गत दोन वर्षापासून सदर जलतरण तलाव बंद असल्याने जिल्ह्यातील जलतरणपटूंची गैरसोय होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जलतरण तलावाचे फ्लोरिंग, टाईलिंग, वॉटर फिल्टर, शॉवर व अन्य सोयी-

सुविधांसाठी लागणाऱ्या साहित्याची सन २००५ पासून कोणतीच दुरुस्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नागपूर जिल्ह्यातील रघुजीनगर येथील कामगार कल्याण मंडळाच्या जलतरण तलावाची गत १८ वर्षापासून दुरुस्ती व देखभाल करण्यात आली नसून, सदर तलावाची देखभाल, दुरुस्ती व अन्य सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) राज्यातील कोविड-१९ प्रार्दुभावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने दिलेल्या निर्देशानुसार मार्च, २०२० पासून सदर जलतरण तलाव बंद आहे.

(२) हे खरे नाही.

सदर जलतरण तलावाचे संचालन, देखभाल व दुरुस्ती २०१७ पर्यंत मंडळातर्फे नियमितपणे करण्यात आली आहे. तसेच सदर जलतरण तलाव दिनांक १ मार्च, २०१८ ते २८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीसाठी मे.क्लोरिनेशन इंजिनिअरिंग यांना कंत्राटी पध्दतीने चालविण्यासाठी देण्यात आला होता.सदर कालावधीत जलतरण तलावाच्या देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे केली आहेत.

(३) कोरोना काळात मार्च २०२० नंतर सलग २ वर्षे जलतरण तलाव बंद असल्यामुळे, जलतरण तलावाच्या दुरुस्ती कामांसाठी मंडळाकडून सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार, सदरची कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांचेमार्फत करुन घेण्यास शासनाने दिनांक ०६/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली होती. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांनी सदर कामासाठी सुधारित अंदाजपत्रकानुसार प्रस्ताव महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास सादर केला आहे. सदर अंदाजपत्रकानुसार जलतरण तलावाची कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांचेकडून करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून शासनास प्राप्त झाला असून, सदरचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.